R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

१०३ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार ३० मे, २०२५ • वर्ष-१०३, अंक-८५, पाने-८, किंमत: ₹ ५

• Vol.- 103, Issue - 85, Marathi - Daily - Mumbai, 30 May, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com


## दगडूशेठ ट्रस्ट साकारणार प्रसिद्ध पद्मनाभस्वामी मंदिर



**पुणे** - पुण्यातील सुप्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टला यंदा १३३ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवासाठी केरळमधील जगप्रसिध्द पद्मनाभस्वामी मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. उद्या सकाळी ९ वाजल्यापासून बाजीराव मार्गावर सणस मैदानाच्या समोरील हिराबाग कोठरी येथे मंदिराची प्रतिकृती उभारण्याच्या कामाला सुरुवात केली जाणार आहे. केरळची राजधानी तिरुअनंतपुरममधील पद्मनाभस्वामी मंदिर देशातील सर्वात श्रीमंत देवस्थानांमध्ये गणले जाते. भगवान विष्णुचे हे मंदिर केरळी आणि द्रविडी वास्तुशिल्पकलेचे एक उत्तम उदाहरण आहे.

## पाकव्याप्त काश्मीर स्वत: भारतात येईल संरक्षण मंत्री राजनाथ सिंहना विश्वास



**पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच अविभाज्य भाग आहे. तो एक दिवस स्वत:हून भारतात सामील होईल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी दहशतवादात सहभागी असलेल्यांना मोठी किंमत मोजावी लागेल, असे म्हणत पाकिस्तानला थेट इशारा दिला.**

■ नवी दिल्ली

**राजनाथ** सिंह दिल्लीत कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीच्या कार्यक्रमात बोलत होते. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. देशाची संरक्षण व्यवस्था पूर्वीपेक्षा अधिक सक्षम व बळकट झाली आहे. दहशतवादाला आळा घालण्यासाठी भारताने ठोस पावले उचलली आहेत. दहशतवादात सामील होणाऱ्यांना आता मोठी किंमत मोजावी लागत आहे.

ते पुढे म्हणाले की, पाकव्याप्त काश्मीरमधील लोक हे आपलेच आहेत. मात्र त्यांची दिशाभूल करण्यात आली आहे. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच भाग आहे आणि मला पूर्ण विश्वास आहे की, एक दिवस तो स्वतःहून भारतात सामील होईल. पाकव्याप्त काश्मीरची स्थिती महाराणा प्रताप यांचे धाकटे भाऊ शक्ती सिंह यांच्यासारखी आहे. शक्ती सिंह काही काळासाठी वेगळे झाले होते, पण ते आपल्या भावाकडेच परतले. त्याचप्रमाणे पाकव्याप्त काश्मीरसुद्धा सध्या आपल्यापासून दूर असला तरी तो पुन्हा भारतात सामील होईल.

राजनाथ सिंह म्हणाले की, पाकिस्तानला हे समजले आहे की, दहशतवादाला प्रोत्साहन देणे परवडणारे नाही. आता जेव्हा चर्चा होईल, तेव्हा ती पाकव्याप्त काश्मीरवर आणि दहशतवादावर असेल. आम्ही मोदीजींच्या एक भारत, महान भारताच्या संकल्पाशी वचनबद्ध आहोत.

# वैष्णवीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका वडिलांना अश्रू अनावर! छळाचा पाढाच वाचला

■ पुणे

**वैष्णवीचे** वडील अनिल कस्पटे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, हगवणे कुटुंबाने केलेले कृत्य आणि माझ्या मुलीचा घेतलेला बळी याला त्यांना वेगळी कलाटणी द्यायची आहे. त्यांना तो गुन्हा लपवायचा आहे म्हणून अशा पद्धतीचे आरोप केले जात आहेत. माझ्या मुलीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले जात आहेत. वैष्णवीच्या मोबाईल चॅटबाबत मला हगवणे कुटुंबाने कुठलीही माहिती दिलेली नाही. तिचा मोबाईल मी काढून घेतला असा त्यांनी आरोप केला. पण मीच तिला मोबाईल दिला होता. त्याचसोबत शशांकलाही दीड लाखांचा मोबाईल घेऊन दिला होता. कारण त्याने त्या मोबाईलची मागणी केली होती. हा मोबाईल घेण्यासाठी तो वाकड येथील क्रोमा स्टोअरमध्ये आला होता. त्यानंतर त्याने वैष्णवीला तिथे बोलावून घेतले. तिला सांगितले की, तुझ्या पप्पांना सांग मला मोबाईल हवा आहे. तिने मला फोन करून तिथे बोलवून घेतले. मी त्याला मोबाईल विकत घेऊन दिला. त्या मोबाईलचे हप्ते आजही मी भरतो आहे. हे सांगताना कस्पटे यांनी मोबाईलचे बिल दाखवले.

**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान हगवणे कुटुंबाने तिच्या चारित्र्यावर संशय घेत अनेक आरोप केले होते. तिचे वडील अनिल कस्पटे यांनी आज हे सर्व आरोप फेटाळून लावले. हे सर्व थांबवा. माझी मुलगी तर गेली. आता तिची बदनामी करू नका, अशी हात जोडून विनवणी करताना त्यांना अश्रू आवरले नाहीत. मृत्युपूर्वी वैष्णवीला सात ते आठ दिवस सतत मारहाण केल्याचा आरोप करत त्यांनी हगवणे कुटुंब प्रत्येक वेळी आपल्याबरोबर कसे वागले, याचा पाढाच वाचून दाखवला.**



ते पुढे म्हणाले की, हगवणे कुटुंब म्हणते की, त्यांनी तिचा हुंड्यासाठी छळ केला नाही, गाडी मागितली नाही, त्यांच्याकडे ५ कोटी ९० लाखांच्या गाड्या आहेत. पण हे सगळे खोटे आहे. हगवणे कुटुंबाकडे एकच फोर्ड गाडी नाही. त्यांच्याकडे जी ९० लाखांची गाडी आहे ती चंद्रकांत हुचडे यांच्या नावावर आहे. शशांक हगवणेने माझ्याकडे लग्नात गाडी मागितली होती. मी त्याच्यासाठी एमजी हेक्टर गाडी बूक केली होती. मात्र त्यांनी माझ्यासोबत वाद घालून फॉर्च्युनर गाडी मागून घेतली. फॉर्च्युनर दिली नाही, तर लग्नाला उभे राहणार नाही, लग्नातून निघून जाईन अशा धमक्या देऊन त्याने माझ्याकडून ही गाडी घेतली. याआधी हगवणे कुटुंबामुळे वैष्णवीची दोन लग्ने मोडली होती, त्यामुळे आम्ही पान ७ वर

### सासू, नवरा, नणंदेला न्यायालयीन कोठडी

वैष्णवी आत्महत्या प्रकरणात आरोपी असलेला पती शशांक, सासू लता आणि नणंद करिश्मा हगवणे यांना काल शिवाजीनगर न्यायालयाने एका दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. त्यानंतर आज त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने या तिघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर लता हगवणे आणि करिश्मा हगवणे यांनी वकिलामार्फत जामिनासाठी अर्ज दाखल केला. या जामीन अर्जावर उद्या सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## आम्ही ईशान्य भारताला विकासाच्या केंद्रस्थानी आणले! मोदी यांचे वक्तव्य

■ बागडोगरा

**भाजपा** सरकारने ईशान्येला विकासाच्या केंद्रस्थानी आणले आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीत पार पडलेल्या ईशान्य भारत गुंतवणूक शिखर परिषदेत देशातील प्रमुख उद्योगपतींनी सहभाग घेतला आणि सिक्कीमसह ईशान्येकडील राज्यांमध्ये गुंतवणुकीच्या विविध घोषणा केल्या, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले.

सिक्कीमच्या भारतात विलीनीकरणाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त गंगटोक येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी पंतप्रधान सिक्कीममध्ये उपस्थित राहणार



होते. मात्र खराब हवामानामुळे त्यांचा हा दौरा रद्द करण्यात आला. त्यानंतर त्यांनी पश्चिम बंगालमधील बागडोगरा येथून व्हर्च्युअल माध्यमातून जनतेला संबोधित केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आजचा दिवस सिक्कीमच्या लोकशाही प्रवासाचा सुवर्ण महोत्सव आहे. तुमच्यात राहून हा ऐतिहासिक क्षण अनुभवायचा होता. मी दिल्लीहून बागडोगरापर्यंत पोहोचलो. तिथून पुढे दारापर्यंतही गेलो. पण खराब हवामानामुळे मला गंगटोकला येणे शक्य झाले नाही. याबद्दल मी सर्व जनतेची माफी मागतो.

पुढे बोलताना पंतप्रधान म्हणाले की, पान ७ वर

## लाडकी बहिणसाठी तिसऱ्यांदा आदिवासी निधी वळविला

■ मुंबई

**राज्य** सरकारने लाडक्या बहिणींसाठी तिसऱ्यांदा सुमारे ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा आदिवासींचा निधी वळविला आहे. या योजनेमुळे इतर खात्यांना फटका बसत आहे. आदिवासी विभागाचा निधी घेताना नीती आयोगाच्या नियमांना केराची टोपली दाखवली आहे. यापूर्वीही दोन वेळेस सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाचा ४१० कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवला होता. नीती आयोगाने सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना तसेच केंद्रातील सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विभागाला पाठवलेल्या पत्रात या संदर्भात स्पष्ट नियमावली दिली आहे. याच नियमांचा आधार घेत आदिवासी विभागाने हा निधी वळवण्यास विरोध केला होता.

## पावसामुळे घरात पाणी शिरलेल्यांना १० हजार देणार

■ पुणे

**राज्यात** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक भागांत नुकसान झाले आहे. बारामतीमध्ये अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात

### उपमुख्यमंत्री पवारांची घोषणा

नुकसान झाले असून, निरा डावा कालवा फुटल्यामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामती मतदारसंघातील पावसामुळे बाधित भागांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान ज्यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले आहे, अशा प्रत्येक कुटुंबाला १० हजार रुपयांची मदत दिली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

बारामतीतून वाहणारा निरा डावा कालवा फुटल्याने अनेक नागरिकांच्या घरात व शेतात पाणी जाऊन नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी अजित पवार यांनी पाहणी दौरा करून अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर आज पुन्हा एकदा अजित पवार यांनी बारामतीत ठिकठिकाणी पाहणी केली. सिद्धेश्वर निंबुडी येथे पावसामुळे नुकसान झालेल्या ठिकाणांची त्यांनी पाहणी केली. या दरम्यान अजित पवारांनी गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या.

### अजित पवार निधी देत नाहीत भाजपाचे पडळकर यांची तक्रार

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार निधी देत नसल्याची तक्रार भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली. यामुळे महायुतीत धुसफूस सुरु असल्याचे चित्र आहे.

आमदार पडळकर यांनी पंढरपूरमध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. यावेळी ते म्हणाले की, धनगर समाजाच्या योजनांना निधी मिळत नाही. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार जबाबदार आहेत. ते निधी अडवत असल्याची बाब खरी आहे. सध्या अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचा विषय आहे. मात्र याबाबत जयंतीनंतर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे.

## सीमावर्ती राज्यांतील मॉक ड्रिल पुढे ढकलले

■ चंदिगढ

**केंद्र** सरकारने आज प्रस्तावित केलेले भारत - पाकिस्तानच्या सीमावर्ती राज्यातील मॉक ड्रिल पुढे ढकलले आहे. या संदर्भात संबंधित राज्यांनी प्रशासनाला सूचना जारी केली. पुढील तारीख नंतर जाहीर केली जाणार आहे.

गृहमंत्रालयाच्या सूचनेनुसार आज सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास गुजरात, राजस्थान, जम्मू-काश्मीर, हरियाणा आणि चंदिगढसह केंद्रशासित प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये मॉक ड्रिल होणार होते. परंतु आता ते पुढील सुचनेपर्यंत पुढे ढकलले आहे. जम्मू-काश्मीरच्या सर्व २० जिल्ह्यांतील मॉक ड्रिलही आज होणार नाही. या मॉक ड्रिलअंतर्गत हवाई हल्ले, ब्लॅकआऊट, आपत्कालीन निर्गमन आणि वैद्यकीय मदतीची चाचपणी होणार होती.

## ट्रम्प यांना कोर्टाचा दणका! टॅरिफ निर्णयाला स्थगिती

■ वॉशिंग्टन

**रेसिप्रोकल** टॅरिफ म्हणजेच जशास तसे आयात शुल्क लावण्याचा निर्णय घेऊन जगाला धक्का देणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेच्याच न्यायालयाने झटका दिला आहे. ट्रम्प यांना अशाप्रकारे देशाच्या आयातीवर निर्बंध लादण्याचे अधिकारच नाहीत, असे म्हणत न्यायालयाने टॅरिफ धोरणाला स्थगिती दिली. न्यायालयाच्या या निर्णयाने भारतासह संपूर्ण जगभरातील देशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.



अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. अमेरिकेच्या आंतराराष्ट्रीय आपत्कालीन वित्तीय अधिकार कायद्याने (आयईईपीए) राष्ट्राध्यक्षांना जागतिक स्तरावर जशास तसे आयात शुल्क लावण्याचा अधिकार दिलेला नाही. त्यामुळे ट्रम्प यांनी घेतलेला निर्णय या कायद्याचे उल्लंघन करणारा आहे, असे निरीक्षण न्यायालयाने हा आदेश देताना नोंदविले.

अमेरिकन न्यायालयाचा हा निर्णय अन्य देशांप्रमाणे भारतासाठी लाभदायक ठरणार आहे. आयात शुल्कवाढीच्या निर्णयानुसार ट्रम्प यांनी भारतावर २६ टक्के आयात शुल्क लावले आहे. हे आयात शुल्क कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी त्याबदल्यात कृषी क्षेत्र खुले करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. भारताने त्या प्रस्तावाला तत्त्वतः मान्यता दिली आहे. मात्र त्यासंबंधीचा करार होणे बाकी आहे.

### इलॉन मस्क ट्रम्प प्रशासनातून बाहेर

टेस्ला, स्पेसएक्ससारख्या दिग्गज कंपन्यांचे मालक अमेरिकेतील अब्जाधीश उद्योगपती इलॉन मस्क यांनी अखेर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. सोशल मीडियावर पोस्ट करून मस्क यांनी आपला हा निर्णय जाहीर केला.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रे दुसऱ्यांदा हाती घेतल्यानंतर ट्रम्प यांनी प्रशासनात सुधारणांचा धडाका लावला. सरकारी खर्च कमी करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी डिपार्टमेंट ऑफ गव्हर्नमेंट इफिशियन्सी (डीओजीई) हे नवे खाते तयार करून ट्रम्प यांनी आपले निकटवर्तीय असलेल्या मस्क यांना त्या खात्याचे प्रमुखपद दिले होते. मात्र ट्रम्प यांनी आणलेल्या नव्या विधेयकावरून मस्क नाराज झाले होते.ट्रम्प यांनी ज्या विधेयकाचे बिग अँड ब्युटिफूल बिल असा उल्लेख केला होता त्या विधेयकाची संभावना मस्क यांनी मंगळवारी वायफळ खर्च करणारे विधेयक अशी केली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ते प्रशासनातून बाहेर पडले.

## महादेव मुंडेंचे आरोपी मोकाट पत्नीचा आत्मदहनाचा इशारा

■ बीड

बीड जिल्ह्याच्या परळी तालुक्यातील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येला १७ महिने उलटून गेले तरी अद्याप पोलीस आरोपींना शोधू शकलेले नाहीत. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे आपल्या पतीला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. तरीही पोलिसांचा तपास इंचभरही पुढे न सरकल्याने अखेर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

यापूर्वी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी तीन वेळा उपोषण केले. प्रत्येक वेळी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी त्यांच्याकडे मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार त्यांनी पोलिसांना वेळ दिला होता. पण तीन महिने उलटूनही पोलिसांना आरोपी सापडले नाहीत. त्यामुळे त्यांनी हा निर्वाणीचा इशारा दिला.

पोलिसांना आरोपी का सापडत नाहीत. इतर प्रकरणातील आरोपींना पोलीस अटक करतात. पण त्यांना केवळ महादेव मुंडे यांची हत्या करणारे आरोपी सापडत नाहीत. एक सामान्य महिला न्याय मागत आहे. त्यामुळे कदाचित त्यांना आरोपी सापडत नसतील. त्यांची हत्या का झाली हे सुद्धा आम्हाला माहीत नाही. याचा तरी पोलिसांनी शोध घ्यावा. कावत यांना याबाबत प्रश्न का पडत नाहीत, असे अनेक प्रश्न ज्ञानेश्वरी मुंडे यांनी उपस्थित केले आहेत.

## पावसामुळे आवक घटली! भाजीपाला महागला

■ नवी मुंबई

**गेल्या** तीन-चार दिवसांत पडलेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका भाजीपाल्याला बसला आहे. शेतांमध्ये भाजीपाला पाण्यात भिजल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले



आहे. परिणामी, नवी मुंबईच्या वाशीतील भाजीपाला मार्केटमध्ये येणाऱ्या भाजीपाल्याची आवक घटली आहे. आवक घटल्याने भाजीपाला महागला आहे. अनेक भाज्यांचे दर दुप्पट झाले आहेत. पावसाआधी दररोज ६०० ते ७०० गाड्या मार्केटमध्ये येत होत्या. पण पावसानंतर बाजारात आता फक्त ४००-४५० गाड्यांचीच आवक होत आहे. त्याचा परिणाम भाज्यांच्या दरावर झाला आहे.

पावसाचा फटका आणि पुरवठ्यातील कमतरता लक्षात घेता, पुढील काही दिवस तरी भाजीपाल्याचे दर चढे राहण्याची शक्यता आहे. या कमतरतेमुळे बाजारात आलेला भाजीपाला ओलसर आणि नाशवंत आहे. ग्राहकांना याचा फटका भाजीपाला दरवाढीच्या स्वरूपात बसला आहे. अनेक भाज्यांचे दर दुप्पट झाले आहेत. तर काही भाज्यांनी शंभरी ओलांडली आहे. किरकोळ बाजारात शेवगा १६० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे. गवार, शिमला मिरची, फ्लॉवर यांसारख्या भाज्यांचे दर १०० ते १३० रुपयांच्या दरम्यान आहेत.

## अमेरिकेची विद्यार्थी व्हिसा मुलाखतींवर तत्काळ बंदी

■ वॉशिंग्टन

**डोनाल्ड** ट्रम्प प्रशासनाने जगभरातील अमेरिकन वाणिज्य दूतावासांना एक नवीन निर्देश जारी केले. याअंतर्गत विद्यार्थी (एफ), व्यवसाय (एम) आणि एक्स्चेंज अभ्यागत (जे)व्हिसा मुलाखतींसाठी नवीन नियुक्त्या तत्काळ बंदी घालण्यात आल्या. हा निर्णय परदेशी विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य सोशल मीडिया स्क्रीनिंग लागू करण्याच्या व्यापक योजनेचा एक भाग आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी स्वाक्षरी केलेल्या कागदपत्रांचा हवाला देत पॉलिटिकोच्या अहवालात स्पष्टपणे म्हटले की, पुढील आदेश मिळेपर्यंत,आवश्यक असलेल्या सोशल मीडिया तपासणीच्या विस्ताराच्या तयारीसाठी, तत्काळ कोणत्याही नवीन विद्यार्थी किंवा एक्स्चेंज अभ्यागत व्हिसा मुलाखतीच्या अपॉइंटमेंट्स नियोजित करू नयेत, ज्याची आम्हाला येत्या काही दिवसांत अपेक्षा आहे.

## १ जूनपासून कागदी फाईल स्वीकारण्यास मनाई

■ मुंबई

**शासकीय** कामकाजात ई - ऑफिसचा वापर बंधनकारक असणार आहे. १ जून पासून कागदी फाईल स्वीकारण्यास शासनाने मनाई केली आहे. त्यामुळे आता एक फाईल दुसऱ्या टेबलवर जाण्याचा वेग वाढणार आहे. राज्यातील शासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख, गतिशील आणि पारदर्शक होण्यासाठी १ जानेवारी २०२५ पासून ई-ऑफिस प्रणालीद्वारे कामकाज करणे सुरू झाले आहे. राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये देखील ही प्रणाली लागू केली जाणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्याच्या अर्थसंकल्प अधिवेशनात दिली होती.




# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

बँक ऑफिससाठी मुले मुलींची भर्ती पगार 16500-35500 संपर्क - **8149378779** {NC250843}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी 'बायका/मुली' पाहिजेत. पगार 18,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC250557}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत. घरकुल केअर सेंटर : **9819426634 / 9969529162** {NC250809}

पगार 12100/- ते 16000/- चर्चगेट ते बोरिवली मोठ्या हॉस्पिटल/हॉटेल/शाळेमध्ये मावशी/ वॉर्डबॉय/हाऊसकिपिंग सुपरवायजर. वयाची अट आहे. संपर्क : **8879753659** {NC250867}

सिक्युरिटी : १२ तास, ₹ 13500 ते 15000 माहीम, धारावी, डोंगरी : **9137835512** {NC250863}

मावशी, सफाई कामगार स्त्री/ पुरुष, वॉर्डबॉय, कुक, ड्रायव्हर, नर्स पाहिजेत. (राहणे खाणे + पगार), वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC250884}

एका नामांकित प्रिंटिंग प्रेससाठी 6 कलर्स CD कोटर मशीनसाठी प्रिंटर, फिडरमन, बॉयलर, हेल्पर आणि Bobs पंचिंग 1080 मशीनसाठी ऑपरेटर पाहिजे. **8652891235** {NC250883}

पंचिंग मशीन ऑपरेटर आणि ग्राफिक डिझायनर पाहिजे. कर्मा ऑफसेट, साकीनाका, मुंबई - संपर्क क्रमांक सावजी भाई - **9892122146** {NC250914}

सिक्युरिटी गार्ड / हाऊसकिपिंग, जेन्टस, लेडीज पाहिजेत. सायन, दादर, मीरारोड, वरळी, गोवंडी, मालाड, बांद्रा, माहीम, परळ. **8291056761 / 8422880513 / 8422880514** {NC250869}

## पाहिजेत

नेरळ शाळेसाठी बस ड्रायव्हर (बॅच असलेली) आवश्यक आहे. बदलापूर ते कर्जत येथील रहिवाशांना प्राधान्य, किमान ५ वर्षांचा अनुभव, राहण्याची सोय उपलब्ध आहे. Call : **9773821837.** engcollege24@gmail.com {NC250868}

मरोळ, अंधेरीयेथे डिलिव्हरी आणि ऑफिस कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क: **9892934566** {NC250826}

नामांकित कुरीयर कंपनीला घाटकोपरसाठी पार्टटाईम डिलिव्हरी बॉय पाहिजेत. तसेच अनुभवी फुल टाईम अकाऊंटट (लेडीज) पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क : **9920033544** {NC250837}

कांदिवली ईस्टसाठी सिक्योरिटी सुपरवाइझर आणि गार्ड्स पाहिजेत. वेतन 15000 ते 18000. त्वरित संपर्क : **9768785795** {NC250834}

अंधेरी येथील एका कंपनीसाठी कॉम्प्युटरचे चांगले ज्ञान असलेली ऑफिस असिस्टंट पाहिजे संपर्क: **9833110154** {NC250857}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट ) **- 9136731541** {NC250812}

प्रॉपर्टीच्या कामासाठी फ्रीलान्सर महिला पाहिजेत. ठाणे/नवी मुंबईमध्ये **7700918713** {NC250817}

जोगेश्वरीत गारमेंट्स मध्ये काम करण्यासाठी जेन्स हेल्पर पाहिजे.- **9967013399 / 9372423814** {NC250888}

आश्रममध्ये कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत. राहणे-खाणे फ्री, पगार 8000-10000. मीरारोड / पनवेल - **8779694066** {NC250851}

## पाहिजेत

लेथमशीन टर्नर, प्लास्टिक इंजेक्शन मोल्डींग मशीन कारागीर, हेल्पर मुले/मुली आणि ड्राफ्टसमन तसेच एम्ब्रोडरी मशीन ऑपरेटर पाहिजेत. 240 शांती इंडस्ट्रीयल इस्टेटजवळ, तांबे नगर, एस.एन.रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई - 400080 - दिलीप पांचाळ - **9221232176** {NC250905}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** ( ठाणे) {NC250918}

एससी/एसटी अत्याचार कायदा, गृहनिर्माण संस्था व न्यायालयांचे कायदेशीर ज्ञान असलेल्या व्यक्तींनी इमेल, फोन करावा. उत्तम पगार, चेंबूर, मुंबई. **9769264102** Email : chembur@calibredevelopers.com {NC250919}

कुर्ला येथे फूटवेअर होलसेल डिलिव्हरीकरिता माणूस पाहिजेत. संपर्क : **9820627795 / 8369645053** {NC250920}

कॉम्प्युटर बिलिंगसाठी संपर्क - **68830319** गिरगांव {NC250921}

मुंबईसाठी पाहिजेत अनुभवी सिक्युरिटीगार्ड व सुपरवायझर पगार 20,000/- to 25,000/- संपर्क : 157, उद्योग भवन सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - 400063. संपर्क - **9322662644 / 44555312** {NC250915}

प्लास्टिक इंजेक्शन मोल्डींग मशीन ऑपरेटर / मोल्ड सेटर पाहिजेत. संपर्क : **8369340218** {NC250906}

ROHIT ALUMINIUM कॉम्प्युटर ऑपरेटर, प्यून, स्लायडींग विंडो कारागीर पाहिजेत. **9820365507 / 9820360842** {NC250916}

LADIES ACCOUNTANT पाहिजेत. B.COM PASS, COMPUTER आवश्यक आहे. त्रिमूर्ती ड्रग हाऊस, 261, रोकडिया लेन, दुकान क्रमांक 3, रामकृपा गोकुळ हॉटेल गली, बोरिवली वे. मोबाईल **9820080732, 9820080772, 7303380772** {NC250917}

## पाहिजेत

कुरियर कंपनीमध्ये विलेपार्लेमध्ये कस्टमर केअर आणि कॉम्प्युटर ऑपरेटरसाठी महिला पाहिजे. 10 - 7. राहुल कुरियर **8655588840** {NC250922}

हाँगकाँग मध्ये लहान मुलाला सांभाळण्यासाठी व जेवण बनवण्यासाठी बाई पाहिजे. **9833432953** {NC250923}

एलआयसी लोन मार्केटिंगसाठी महिला/पुरुष पाहिजेत. पगार 12000 + कमिशन - दादर पश्चिम. **8291044924** {NC250924}

## Situation Vacant

REQUIRED OFFICE STAFF (PEON) 12TH PASS + COMPUTER KNOWLEDGE, SALARY - 12000/- + JALARAM - BORIVALI **9820441711 / 9820000538** {NC250866}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC250861}

## नर्सिंग कोर्स

गव्हर्नमेंट मान्यता 10वी/12वी पास/नापास मुले-मुलींसाठी पेशंटकेअर, डिप्लोमा पेशंट केअर/मेडिकल लॅबोरेटरी DMLT/X-RAY, टेक्निशियन, ऑपरेशन थिएटर/ Physiotheray कोर्स करिता संपर्क : Dr. Shrivastav :- **9769116609 / 9702029738** LMP Paramedical Institute Borivali {NC250741}

## वधु वर मेळावा

सर्व जाती मराठा, बौद्ध, आगरी, कल्याण **9869868620** {NC250801}




एकेकाळी जागतिक आयातीवर अवलंबून असणाऱ्या भारताच्या कृषीक्षेत्राने केवळ भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्णच बनवले नाही तर निर्यातप्रधानही बनवले. अन्नधान्याची मुबलक उपलब्धता ही सध्याच्या हवामान बदलांमुळे होणाऱ्या प्रतिकूल परिणामांच्या काळात कोणत्याही राष्ट्रासाठी शक्तीस्थान ठरत आहे. भारताचा विचार करता, सद्यस्थितीत देशात एक वर्षापेक्षा अधिक काळ पुरेल एवढा गहू आणि तांदळाचा साठा आहे. अन्नधान्य मंत्रालयाच्या नव्या आकडेवारीनुसार एप्रिल २०२५ पर्यंत भारताच्या गोदामात सुमारे ६६१.७ लाख टन गहू अणि तांदळाचा साठा असून तो २०२३-२४ मध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीच्या मार्फत वितरीत केलेल्या ५२० टनापेक्षा अधिक आहे.

# आधार विक्रमी धान्योत्पादनाचा

**जयंतीलाल भंडारी,**
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

पाच वर्षांपूर्वी कोरोना काळात देशासाठी अन्नधान्याचा साठा हा महत्त्वाचा आधार ठरला होता. त्याचप्रमाणे पाकिस्तानशी संघर्षाची स्थिती असताना विक्रमी धान्योत्पादन आणि अन्नधान्यप्रक्रिया उत्पादन हे भारताचे बलस्थान ठरले. कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या मते, २०२४-२५ साठी जारी प्रमुख पीक (खरीप आणि रबी) उत्पादनाची स्थिती पाहता दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार तांदूळ, गहू, मका, तेलबिया, भूईमुग आणि सोयाबीनसह तुरडाळ आणि चणाडाळीचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता आहे. अजूनही भारताकडे ५४ लाख टन साखरेचा साठा आहे आणि हा साठा दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ पुरेल एवढा आहे. त्याचवेळी १८ लाख टन डाळीचा साठा आहे. एवढेच नाही तर देशात विक्रमी म्हणजे ३३ कोटी टनपेक्षा अधिक अन्नधान्य उत्पादन होण्याचा अंदाज आहे. फळ आणि भाजीपाल्याच्या उत्पादनात देखील वाढ होईल. एवढेच नाही तर २०२४-२५

**अलिकडेच वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळात अमेरिकी शुल्क धोरणाचे आव्हान आणि जागतिक व्यापारावरुन असणारी अनिश्चिता या काळात भारताने कृषी निर्यातीत मजबूत वाढ नोंदविली आहे. देशाच्या एकूण कृषी निर्यातीने ५० अब्ज डॉलरने टप्पा ओलांडला आहे.**

च्या जीडीपीत कृषी आणि संलग्न क्षेत्रातील योगदानात ४.६ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी हा विकास दर २.७ टक्के होता. चांगला पाऊस देखील कृषी विकासाला बुस्ट देऊ शकेल.

हवामान खात्याने यावर्षी देशात सरासरीपेक्षा पाच टक्के अधिक पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे ग्रामीण भारतासह संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि देशाची कृषी निर्यात देखील वाढेल. देशात वाढते अन्नधान्य उत्पादन आणि मजबूत ग्रामीण आर्थिक व्यवस्था देखील देशाची आर्थिक शक्ती म्हणून समोर येत आहे. सध्या देशात गोदामे खाद्यान्नांनी भरलेली आहेत आणि निर्यातही वाढत आहे.

भारताच्या कृषी क्षेत्रातील निर्यात वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे तांदळाच्या निर्यातीत झालेली २० टक्के वाढ. धानाचे बंपर उत्पादन आणि साठ्याची शक्यता पाहता सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये तांदळाच्या निर्यातीवरचे निर्बंध शिथिल केले. २०२४-२५ मध्ये तांदळाची निर्यात वाढून ती १२.४७ अब्ज डॉलरपेक्षा अधिक झाली. गेल्या दहा वर्षांपासून भारत तांदळाचा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. एकेकाळी खाद्यान्न टंचाईचा सामना करणारा देश आता अतिरिक्त साठा करत आहे, हे एक परिवर्तन आहे.

आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तुलनेत कृषी आणि अन्नधान्यप्रक्रिया उत्पादनाची निर्यात २०२४-२५ मध्ये वाढत २५.१४ अब्ज डॉलर झाली. या उद्योगात गेल्या दहा वर्षात ५० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक प्रत्यक्ष परकी गुंतवणूक (एफडीआय)



झाली आहे. या दृष्टीकोनातून पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने (पीएचडीसीसीआय)अन्नधान्य प्रक्रियेवर जारी केलेला अभ्यास अहवाल उल्लेखनीय आहे. या अहवालानुसार भारतातील अन्नधान्य प्रकिया क्षेत्र २०३० पर्यंत ७०० अब्ज डॉलर, २०३५ पर्यंत ११०० अब्ज डॉलर आणि २०४७ पर्यंत २१५० अब्ज डॉलरपर्यंत पोचण्याची शक्यता आहे. यासाठी नव्या व्यापार युगात भारतासाठी कृषी आणि ग्रामीण विकासाला आणखी बळ द्यावे लागणार आहे.

ट्रम्प यांच्या शुल्क धोरणावरून देशाला सहन कराव्या लागणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी आणि भविष्यातील कोणत्याही आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी सरकारला कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत सुधारणा करत त्यास वेगाने वाटचाल करण्याच्या दिशेने न्यावे लागेल. कृषी क्षेत्रात पायाभूत आणि व्यवस्थेतर्गत रचनेत गेल्या दहा वर्षांपासून नियोजनबद्धरित्या आखणी केल्याने त्याचे चांगले परिणाम हाती लागत आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाची व्याप्ती वाढल्याने ग्रामीण आणि शहरातील अंतर कमी झाले आहे.

### नव्या धोरणाची गरज

आगामी काळात सरकारला कृषी विकास दर वाढविणे, खाद्यान्नाचे उत्पादन वाढविणे, खाद्यान्नाची नासाडी रोखणे, शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात गोदाम उपलब्ध करून देणे याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. भारत अजूनही धान्य, डाळ आणि तेलबियाच्या उत्पादनासाठी हवामानावर अवलंबून आहे. कधी गरजेपेक्षा अधिक तर कधी गरजेपेक्षा कमी पाऊस हे उत्पादनाचे गणित बिघडविण्याचे काम करतात. अशावेळी क्षेत्रनिहाय आणि पिकासाठी पोषक असणारे वातावरण याचा व्यापक अभ्यास करत सिंचन व्यवस्थेतून लाभदायी ठरणारे नवे धोरण आखावे लागेल.

### साठवणक्षमता वाढवण्याची गरज

सध्या देशात अंदाजित खाद्यान्न उत्पादन ३३ कोटी टनापेक्षा अधिक असताना त्याची साठवण क्षमता ही एकूण उत्पादनापेक्षा कमीच आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे. अशावेळी अन्नाची नासाडी थांबविण्यासाठी देशात २०२८ पर्यंत सहकारी क्षेत्राच्या माध्यमातून देशभरात ७०० लाख टन साठवण क्षमता असणारे वेअरहाऊस, गोदाम विकसित करण्याच्या महत्त्वाच्या योजनेवर वेगाने काम करावे लागणार आहे.

एकुणातच कृषी क्षेत्रात सक्षम स्थान मिळवण्यासाठी सरकारला धोरणात्मक पावले टाकावी लागणार आहेत. अमेरिकेसमवेत द्विपक्षीय करार होत असताना भारताच्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हिताकडेही लक्ष द्यावे लागेल. नुकतेच केंद्र सरकारने खरीपातील प्रमुख शेतीपीकांच्या एमएसपीमध्ये वाढ करून शेतकऱ्यांना नवे प्रोत्साहन दिले आहे. निसर्गाची कृपादृष्टी राहिल्यास यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी आनंदवर्षा करणारा ठरेल. ◆◆



# आजचे राशी भविष्य

शुक्रवार दि. ३० मे २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | आज काही कामे परत परत करावी लागतील. जवळच्या प्रवासाचे योग येतील. नोकरीमध्ये नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. |
| वृषभ | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. घरासंबंधीची कामे मार्गी लागतील. काहींना अचानक लाभाचे योग येतील. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात तुम्ही केलेल्या कामगिरीने मान वाढेल. संततीस उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील. जोडीदार तुमच्या मनाप्रमाणे वागेल. |
| कर्क | कामानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी जाणवतील. |
| सिंह | तुम्ही केलेल्या परिश्रमांनी आर्थिक लाभाचे प्रमाण वाढणार आहे. भावंडांच्या आरोग्याच्या समस्या उद्भवतील. संततीच्या माध्यमातून लाभ मिळतील. |
| कन्या | तुमचा सामाजिक दर्जा वाढेल. एखाद्या धार्मिक स्थळी भेट देण्याचा योग येईल. विवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल काळ असेल. |
| तूळ | गुरुजनांचा आशीर्वाद लाभेल.तुमची अडकलेली कामे मार्गी लागतील. आर्थिक स्थित्यंतरे जाणवतील. |
| वृश्चिक | मनात आध्यात्मिक विचार ठेवा. काहींना अचानक धनलाभाचे योग येतील. व्यावसायिक क्षेत्रात स्थित्यंतरे जाणवतील. |
| धनु | थोरामोठ्यांच्या ओळखीचा फायदा होईल. नोकरीमध्ये सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात.जोडीदाराच्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागेल. |
| मकर | नोकरीमध्ये तुमचे कौशल्य सिद्ध कराल. व्यावसायिक क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील. स्पर्धापरीक्षा देणाऱ्यांसाठी शुभकाळ. |
| कुंभ | मनामध्ये सकारात्मक विचार राहतील. मोठी गुंतवणूक करण्याचे तूर्तास थांबा. जोडीदाराच्या नातेवाईकांचे घरी आगमन होईल. |
| मीन | आर्थिक लाभाचे प्रमाण कमी जास्त राहील. खर्चाचे प्रमाण वाढेल. जोडीदाराशी मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्या. |

## निकाल — गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी)

सोडत संध्या. 5:00

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 22 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 29/05/2025

पहिले बक्षिस रु. 10000/- जिंकले **MG-01 : 7642** ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- **1990**

तिसरे बक्षिस रु. 1000/- 1951 | 4263 (अंबिका एजन्सी, दादर, मुंबई) | 6299 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 7677 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी, पुणे) | 8983 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी, पुणे)

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 400/- | 2204 | 3419 | 4704 | 5693 | 6576 | 7702 | 7971 | 8778 |
| 1174 | 2251 | 3913 | 4800 | 5709 | 6597 | 7731 | 8076 | 8782 |
| 1180 | 2541 | 3972 | 4919 | 5878 | 6817 | 7762 | 8108 | 8807 |
| 1192 | 2544 | 4049 | 4936 | 5888 | 6856 | 7768 | 8208 | 8838 |
| 1418 | 2587 | 4174 | 4990 | 6027 | 6959 | 7775 | 8368 | 8840 |
| 1981 | 2844 | 4423 | 5051 | 6039 | 6964 | 7790 | 8451 | 8858 |
| 1996 | 3109 | 4484 | 5569 | 6227 | 7040 | 7798 | 8485 | 8884 |
| 2002 | 3173 | 4547 | 5669 | 6333 | 7070 | 7845 | 8622 | 8900 |
| 2061 | 3369 | 4571 | 5688 | 6472 | 7346 | 7880 | 8762 | 8943 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी)

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 22 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 29/05/2025

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 3686 | 0623 | 1737 | 3712 | 2639 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- 1411 | 3689

तिसरे बक्षिस रु. 2000/- 0855 | 2183 | 6824 | 8077 | 8483 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर)

चौथे बक्षिस रु. 1000/- 0390 1255 1273 1717 2223 3693 6365 6854 8021 9678

पाचवे बक्षिस रु. 500/- 0534 0941 1380 1412 4722 5083 5295 6122 9447 9782

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 0625 | 1917 | 2638 | 3437 | 4400 | 5656 | 6465 | 7577 | 8331 | 8987 |
| | 0681 | 1958 | 2689 | 3443 | 4423 | 5693 | 6509 | 7636 | 8378 | 9209 |
| 0002 | 0828 | 1982 | 2726 | 3488 | 4461 | 5718 | 6546 | 7709 | 8433 | 9419 |
| 0005 | 1111 | 2006 | 2734 | 3534 | 4467 | 5827 | 6640 | 7734 | 8448 | 9455 |
| 0013 | 1129 | 2019 | 2809 | 3543 | 4469 | 5859 | 6644 | 7753 | 8524 | 9493 |
| 0034 | 1133 | 2024 | 2815 | 3637 | 4482 | 5879 | 6650 | 7836 | 8584 | 9506 |
| 0047 | 1142 | 2067 | 2839 | 3662 | 4655 | 5887 | 6675 | 7850 | 8610 | 9553 |
| 0081 | 1235 | 2127 | 2843 | 3785 | 4905 | 5970 | 6723 | 7853 | 8663 | 9632 |
| 0087 | 1241 | 2153 | 2858 | 3829 | 5086 | 5971 | 6766 | 7899 | 8685 | 9766 |
| 0144 | 1296 | 2183 | 2988 | 3931 | 5111 | 6066 | 6780 | 7909 | 8699 | 9769 |
| 0180 | 1321 | 2245 | 3216 | 4144 | 5117 | 6067 | 6838 | 7925 | 8801 | 9777 |
| 0294 | 1415 | 2278 | 3218 | 4146 | 5172 | 6082 | 6887 | 7974 | 8802 | 9829 |
| 0301 | 1420 | 2312 | 3239 | 4193 | 5280 | 6146 | 6988 | 8002 | 8806 | 9834 |
| 0403 | 1431 | 2379 | 3262 | 4206 | 5359 | 6221 | 7203 | 8050 | 8808 | 9835 |
| 0409 | 1458 | 2390 | 3311 | 4214 | 5391 | 6241 | 7207 | 8073 | 8840 | 9892 |
| 0416 | 1598 | 2395 | 3314 | 4228 | 5571 | 6316 | 7250 | 8168 | 8861 | 9904 |
| 0522 | 1613 | 2409 | 3315 | 4341 | 5618 | 6360 | 7272 | 8264 | 8864 | 9930 |
| 0606 | 1614 | 2529 | 3353 | 4368 | 5628 | 6366 | 7523 | 8266 | 8873 | 9941 |
| 0610 | 1913 | 2632 | 3433 | 4397 | 5635 | 6416 | 7539 | 8282 | 8914 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ३०/०५/२०२५

| | | |
|---|---|---|
| ० | ५ | ७ |
| ०१ | ५१ | ७१ |
| ०६ | ५६ | ७६ |
| २८० | ३४८ | २५० |
| ४८८ | २३० | ४५८ |

# लातूर-सोलापूर महामार्गावर २ बसची टक्कर २ जणांचा मृत्यू! ३४ प्रवासी जखमी

■ लातूर

**लातूर-सोलापूर** महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. चार दिवसांपूर्वी माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या गाडीचा याच महामार्गावर अपघात झाला होता. त्याच ठिकाणापासून काही अंतरावर आज पहाटे कृष्णा ट्रॅव्हल्स आणि अभिनव ट्रॅव्हल्स या दोन कंपन्यांच्या बसची टक्कर झाली. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून ३४ प्रवासी जखमी झाले. तुळजापूर ते लातूर महामार्गावर एकता बियर बारजवळ उदगीरकडे निघालेल्या कृष्णा ट्रॅव्हल्सच्या बसने अभिनव ट्रॅव्हल्सच्या बसला धडक दिली. यात कृष्णा ट्रॅव्हल्सची बस जागीच उलटली.त्यामुळे बसमधील ३४ प्रवासी जखमी झाले. तर दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. यात अभिनव ट्रॅव्हल्सचा क्लीनर नामदेव सूर्यवंशी याचा समावेश होता.

# कोल्हापुरात महात्मा गांधी मैदान दुरुस्तीसाठी ठाकरे गटाचे आंदोलन

■ कोल्हापूर

कोल्हापुरात अवकाळी पावसामुळे गांधी मैदानाला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दरवर्षी पावसाळ्यात मैदानाची अशीच स्थिती होत असल्याने आज ठाकरे गटाच्यावतीने येथे आंदोलन करण्यात आले. ठाकरे गटाचे शहर प्रमुख रवीकरण इंगवले यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. शिंदे गटाचे आमदार राजेश क्षीरसागर विकास कामांसाठी निधी आणतात आणि स्वत:च्या घरचा व प्रॉपर्टीचा विकास करतात, असा आरोप ठाकरे गटाने केला. आंदोलनादरम्यान ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी याच मैदानात राजेश क्षीरसागर यांच्या प्रतिमेला जलसमाधी दिली. यावेळी पोलीस आणि कार्यकर्ते यांच्यात झटापट झाली.

# उद्योजक संतोष लड्डा यांचे साडेपाच किलो सोने गेले कुठे?

■ छत्रपती संभाजीनगर

**वाळूज** परिसरातील राहणारे उद्योजक संतोष लड्डा यांच्या घरावर १५ मे रोजी मध्यरात्री ६ दरोडेखोरांनी दरोडा टाकला. यामध्ये ५.५ किलो सोने आणि ३२ किलो चांदी या मालाची चोरी झाली. याप्रकरणातील ६ पैकी ५ आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. त्यांच्यातील सहावा आरोपी अमोल खोतकर दोन दिवसांपूर्वी पोलीस चकमकीत ठार झाला.पोलिसांना आरोपींकडून ५.५ पैकी केवळ २० तोळे सोने परत मिळाले आहे. त्यामुळे इतर सोने आणि चांदी कुठे आहे असा सवाल निर्माण झाला आहे. पोलिसांच्या ताब्यात असलेल्या पाच आरोपींनी उर्वरित सोने आणि चांदीच्या दागिन्यांबद्दल काय माहिती दिली हे पोलिसांनी स्पष्ट केले नाही. ज्यांच्या घरात चोरी झाली ते लड्डा म्हणाले की, चोरी झाली तेव्हा ते भारतात नव्हते. १८ मे रोजी ते भारतात परतले. त्यांनी पोलीस तपासावरही समाधान व्यक्त केले. त्याचबरोबर आपल्याला कोणावरही संशय नाही,असेही ते म्हणतात.एवढा ऐवज घरात ठेवला असताना सीसीटिव्ही कॅमेरे का लावले नाहीत,असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारला असता कॅमेरे बसवून घ्यायला वेळच मिळाला नाही,असे गुळमुळीत उत्तर लड्डा यांनी दिले.तर दुसरीकडे पोलीस म्हणतात की, तपास सुरू आहे.

## आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी (महाराष्ट्र राज्य लॉटरी)

सोडत दर गुरुवारी • तिकीट किमत रु. 50/- • सोडत क्र. 22 • सोडत दिनांक 29/05/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख **AP-04 : 1298**

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **1298** श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1744 | 2373 | 3304 | 4258 | 4999 | 6247 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1272 | 2326 | 2743 | 2838 | 3415 | 5840 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2108 | 2561 | 4467 | 5172 | 5665 | 6927 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1668 | 4560 | 5902 | 6014 | 6414 | 6850 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1869 | 2246 | 2625 | 3108 | 3388 | 3896 | 4331 | 4717 | 5257 | 5658 | 6060 | 6621 |
| | | 1871 | 2255 | 2627 | 3113 | 3393 | 3900 | 4336 | 4724 | 5295 | 5690 | 6076 | 6626 |
| 1008 | 1388 | 1919 | 2257 | 2667 | 3123 | 3397 | 3935 | 4341 | 4748 | 5312 | 5692 | 6099 | 6636 |
| 1012 | 1406 | 1920 | 2258 | 2681 | 3126 | 3436 | 3947 | 4388 | 4749 | 5334 | 5700 | 6106 | 6664 |
| 1021 | 1410 | 1968 | 2262 | 2703 | 3133 | 3450 | 3963 | 4393 | 4753 | 5336 | 5704 | 6123 | 6671 |
| 1023 | 1424 | 1969 | 2270 | 2712 | 3155 | 3487 | 3977 | 4406 | 4754 | 5344 | 5719 | 6131 | 6684 |
| 1051 | 1443 | 1970 | 2271 | 2721 | 3172 | 3503 | 3991 | 4422 | 4759 | 5355 | 5740 | 6133 | 6685 |
| 1074 | 1444 | 1975 | 2275 | 2725 | 3186 | 3506 | 3997 | 4434 | 4779 | 5375 | 5751 | 6145 | 6688 |
| 1104 | 1457 | 1979 | 2281 | 2727 | 3215 | 3535 | 3998 | 4445 | 4821 | 5435 | 5755 | 6166 | 6695 |
| 1107 | 1466 | 2005 | 2282 | 2740 | 3221 | 3568 | 4015 | 4448 | 4835 | 5457 | 5757 | 6176 | 6697 |
| 1117 | 1487 | 2028 | 2285 | 2750 | 3231 | 3576 | 4041 | 4449 | 4843 | 5464 | 5758 | 6178 | 6704 |
| 1121 | 1511 | 2029 | 2287 | 2772 | 3233 | 3625 | 4044 | 4453 | 4845 | 5475 | 5775 | 6182 | 6706 |
| 1124 | 1526 | 2052 | 2288 | 2782 | 3239 | 3627 | 4055 | 4458 | 4857 | 5482 | 5785 | 6187 | 6716 |
| 1141 | 1531 | 2072 | 2291 | 2792 | 3243 | 3638 | 4068 | 4459 | 4898 | 5490 | 5788 | 6269 | 6722 |
| 1142 | 1540 | 2077 | 2323 | 2808 | 3251 | 3665 | 4098 | 4476 | 4900 | 5496 | 5795 | 6286 | 6758 |
| 1164 | 1572 | 2084 | 2324 | 2809 | 3263 | 3690 | 4106 | 4478 | 4904 | 5498 | 5823 | 6290 | 6761 |
| 1168 | 1606 | 2088 | 2341 | 2817 | 3270 | 3728 | 4107 | 4489 | 4934 | 5502 | 5825 | 6321 | 6764 |
| 1171 | 1610 | 2108 | 2374 | 2818 | 3302 | 3730 | 4111 | 4490 | 4979 | 5509 | 5834 | 6328 | 6765 |
| 1172 | 1612 | 2115 | 2375 | 2822 | 3307 | 3737 | 4113 | 4496 | 4989 | 5510 | 5845 | 6341 | 6766 |
| 1181 | 1639 | 2121 | 2422 | 2824 | 3314 | 3739 | 4150 | 4497 | 4998 | 5514 | 5857 | 6346 | 6769 |
| 1182 | 1661 | 2126 | 2428 | 2826 | 3323 | 3770 | 4160 | 4511 | 5008 | 5530 | 5894 | 6419 | 6779 |
| 1186 | 1671 | 2128 | 2429 | 2828 | 3329 | 3773 | 4167 | 4541 | 5045 | 5533 | 5900 | 6464 | 6781 |
| 1188 | 1675 | 2166 | 2455 | 2840 | 3332 | 3781 | 4170 | 4542 | 5053 | 5543 | 5912 | 6465 | 6786 |
| 1190 | 1700 | 2177 | 2459 | 2848 | 3339 | 3803 | 4174 | 4553 | 5056 | 5546 | 5919 | 6478 | 6796 |
| 1191 | 1701 | 2178 | 2470 | 2854 | 3343 | 3824 | 4189 | 4559 | 5058 | 5548 | 5920 | 6502 | 6817 |
| 1213 | 1716 | 2180 | 2475 | 2866 | 3345 | 3825 | 4204 | 4594 | 5082 | 5551 | 5931 | 6546 | 6863 |
| 1230 | 1718 | 2198 | 2478 | 2872 | 3349 | 3832 | 4214 | 4616 | 5095 | 5552 | 5953 | 6556 | 6866 |
| 1253 | 1771 | 2207 | 2495 | 2925 | 3351 | 3834 | 4243 | 4629 | 5097 | 5553 | 5955 | 6562 | 6877 |
| 1269 | 1772 | 2208 | 2535 | 2947 | 3354 | 3837 | 4245 | 4631 | 5146 | 5573 | 5958 | 6565 | 6891 |
| 1279 | 1781 | 2209 | 2548 | 2977 | 3359 | 3863 | 4247 | 4666 | 5147 | 5579 | 5969 | 6568 | 6903 |
| 1312 | 1809 | 2212 | 2563 | 3006 | 3365 | 3869 | 4255 | 4677 | 5150 | 5605 | 5986 | 6576 | 6906 |
| 1315 | 1816 | 2219 | 2568 | 3010 | 3369 | 3873 | 4263 | 4685 | 5165 | 5610 | 5989 | 6578 | 6933 |
| 1328 | 1833 | 2220 | 2570 | 3014 | 3373 | 3880 | 4273 | 4689 | 5189 | 5633 | 6006 | 6600 | 6962 |
| 1338 | 1842 | 2221 | 2572 | 3031 | 3379 | 3885 | 4278 | 4711 | 5230 | 5638 | 6007 | 6607 | 6969 |
| 1341 | 1850 | 2222 | 2577 | 3039 | 3380 | 3894 | 4297 | 4715 | 5236 | 5644 | 6018 | 6609 | 6995 |
| 1364 | 1851 | 2245 | 2582 | 3088 | 3383 | 3895 | 4328 | 4716 | 5256 | 5654 | 6029 | 6610 | 6999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## — लॉटरी —

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री (महाराष्ट्र राज्य लॉटरी)

• दीपलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 22 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 29/05/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **SD-00 : 4657**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- **5888** रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद

तिसरे बक्षिस रु. 2000/- 1726 | 3027 | 5975 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर)

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1133 | 2219 | 3234 | 4048 | 5528 |
| 1184 | 2528 | 3326 | 4322 | 5591 |
| 1277 | 2746 | 3559 | 4371 | 5605 |
| 1384 | 2827 | 3635 | 4414 | 5670 |
| 1731 | 2856 | 3639 | 4428 | 5851 |
| 1760 | 2881 | 3743 | 4541 | 5880 |
| 1981 | 3038 | 3845 | 4653 | 5916 |
| 2187 | 3114 | 3971 | 4941 | 5972 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

देश विदेश

# मणिपूरमध्ये सरकार स्थापण्याच्या हालचालींना वेग! भाजपाचा दावा

## १० आमदारांनी घेतली राज्यपालांची भेट!

■ इंफाळ



**मणिपूरमध्ये** पुन्हा एकदा भाजपा सरकार स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. दोन समाजातील वादामुळे अशांत असलेल्या मणिपूरमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपा एनडीएच्या १० आमदारांनी मणिपूरचे राज्यपाल अजय भल्ला यांची भेट घेत सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे.काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना या आमदारांनी पत्र पाठविले होते.

या पत्रात मणिपूरमध्ये शांतता नांदविण्यासाठी लोकप्रिय सरकार स्थापन करण्याची मागणी केली होती. या पत्रावर भाजपाच्या १३, एनपीपी व नागा पीपल्स फ्रंटचे प्रत्येकी तीन आणि दोन अपक्ष अशा २१ आमदारांची सही होती. त्यानंतर भाजपाच्या नेतृत्वात या दहा आमदारांनी सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली.यावेळी त्यांनी ४४ आमदारांचे समर्थन असल्याचा दावा केला. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी मणिपूरमध्ये ११ व्यांदा राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. यानंतर आता लवकरच मणिपूरमध्ये पुन्हा भाजपा सरकार स्थापन होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. राज्यपालांच्या भेटीनंतर आमदार थोक्चोम राधेश्याम सिंह म्हणाले की, आम्हाला ४४ आमदारांचा पाठिंबा आहे.जनतेच्या इच्छेनुसार सरकार स्थापन करण्यास आम्ही तयार आहोत. राज्यपालांनी आमच्या बहुमताचा विचार करून तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी आम्ही केली.

# स्पेनजवळ विस्थापितांची बोट बुडून ७ जणींना जलसमाधी

■ बार्सिलोना

**स्पेनच्या** कॅनरी आयलंड या बेटांवर पोहोचण्याच्या प्रयत्नात असलेली विस्थापितांची एक बोट बुडून ४ महिला आणि ३ मुली अशा ७ जणींना जलसमाधी मिळाली. बोट बुडाली तेव्हा ही बोट किनाऱ्यापासून ६ मैल अंतरावर होती. या घटनेची माहिती मिळाल्यावर स्पेनच्या सागरी सुरक्षा पथकाने मदत आणि बचावकार्य सुरू केले.

या लहान बोटीमध्ये क्षमतेपेक्षा ८० हून अधिक लोक बसली होती. या बोटीमध्ये असलेल्या प्रवाशांच्या हालचालींमुळे बोट उलटली. त्यामुळे प्रवासी पाण्यामध्ये पडले.

# पॅराग्वेचे राष्ट्राध्यक्ष २ जूनपासून ३ दिवसीय भारत दौऱ्यावर

■ असुनसिओन

**पॅराग्वेचे** राष्ट्राध्यक्ष सँटियागो पेना पॅलासिओस २ ते ४ जूनदरम्यान भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून ते भारत भेटीवर येणार आहेत. त्यांचा हा पहिलाच भारत दौरा असणार आहे.

भारत भेटीवेळी ते २ जून रोजी नवी दिल्लीत मोदींशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. व्यापार, शेती, आरोग्य, औषधनिर्माण आणि माहिती तंत्रज्ञानसारख्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश असलेल्या द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेण्यावर ही चर्चा केंद्रित असेल. त्यांच्या सन्मानार्थ पंतप्रधान मोदी दुपारच्या भोजनाचे आयोजन देखील करणार आहेत. ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांची भेट घेतील, त्यांच्यासोबत मंत्री,वरिष्ठ अधिकारी आणि व्यावसायिक प्रतिनिधींचा समावेश असलेले उच्चस्तरीय शिष्टमंडळ असेल.४ जून रोजी पॅराग्वेला परतण्यापूर्वी त्यांच्या प्रवास कार्यक्रमात मुंबईला भेट देण्याचा समावेश आहे.

# गुजरातमध्ये पंचायत निवडणुका २२ जून रोजी मतदान होणार

■ अहमदाबाद

**गुजरात** राज्य निवडणूक आयोगाने अखेर बहुप्रतिक्षित ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची घोषणा केली. त्यानुसार राज्यातील ८ हजार ३२७ ग्रामपंचायतींसाठी २२ जून रोजी मतदान होईल. तर २५ जून रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होतील. या ग्रामपंचायतीपैकी काहींची मुदत कधीच संपली आहे. तर काही ग्राम पंचायतींची मुदत संपायला काही दिवस शिल्लक राहिले आहेत. स्थानिक पातळीवरील या निवडणुकांमध्ये १ कोटी ३० लाख मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

# पाकिस्तानसाठी हेरगिरी! हिमाचलमध्ये तरुण अटकेत

■ शिमला

**हिमाचल** प्रदेशातील कांगडा जिल्ह्यात पाकिस्तानसाठी हेरगिरी करत असल्याच्या संशयावरून अभिषेक भारद्वाज (२०) या तरुणाला अटक करण्यात आली आहे.

कांगड्याचे पोलीस अधीक्षक मयंक चौधरी म्हणाले की, अभिषेकच्या मोबाईलमधून देशाच्या सुरक्षेशी संबंधित दस्तऐवज आणि छायाचित्रे जप्त करण्यात आली आहेत. सध्या त्यांची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे.

अभिषेकने कॉलेज शिक्षण अर्धवट सोडले होते आणि त्यानंतर तो विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून देशविरोधी कृत्यांमध्ये सहभागी झाला होता. त्याच्या फेसबुक खात्यावर ३०९२ मित्र आहेत, यापैकी अनेक खाती पाकिस्तानशी संबंधित असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. ऑपरेशन सिंदूरच्या नंतर पोलिसांनी सर्व ऑनलाइन व ऑफलाइन हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली होती.

# गाझामध्ये अन्नासाठी झालेल्या चेंगराचेंगरीत तीन जणांचा मृत्यू

■ राफा



**गाझामधील** राफा येथे अन्न मिळवण्यासाठी जमलेल्या पॅलेस्टिनी नागरिकांमध्ये चेंगराचेंगरी होऊन तीन जणांचा मृत्यू झाला असून ४६ जण जखमी झाले आहेत. तसेच ७ जण अद्याप बेपत्ता आहेत.

गेल्या अडीच महिन्यांपासून गाझामधील संयुक्त राष्ट्रसंघ व इतर संस्थांकडे असलेला अन्नसाठा संपुष्टात आल्याने तिथे भीषण उपासमारीची स्थिती निर्माण झाली आहे. राफामधील अमेरिकेच्या निधीतून चालणाऱ्या मदत केंद्रात दररोज हजारो नागरिक जेवणासाठी गर्दी करत आहेत. याठिकाणी इस्त्रायली सैनिकांनी हवेत गोळीबार केल्याने घबराट उडाली आणि चेंगराचेंगरी झाली.

गाझाच्या राज्य माध्यम कार्यालयाने दिलेल्या निवेदनानुसार, इस्त्रायलने गाझासाठी एका आठवड्याची मदत पाठवण्याचे आश्वासन दिले आहे. याच काळात अन्न वाटपासाठी नवीन वितरण केंद्रे उभारली जातील. ही केंद्रे इस्त्रायली सैन्याच्या देखरेखीखाली अमेरिकन कंपन्यांद्वारे चालवली जाणार आहेत.

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी गाझामधील दुष्काळ टाळण्यासाठी मदत पोहोचवणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, ही मदत हमासऐवजी गरजू नागरिकांपर्यंत पोहोचावी याची काळजी इस्त्रायल घेईल.

# पोर्शे प्रकरणातील डॉ. अजय तावरे किडनी रॅकेट प्रकरणात ताब्यात

■ पुणे

**पुण्यातील** गाजलेल्या पोर्शे अपघात प्रकरणातील ससून रुग्णालयाचे तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे यांचा रुबी हॉल क्लिनिकमधील किडनी प्रत्यारोपण रॅकेटमध्ये सहभाग उघड झाल्यानंतर पुणे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणात त्याला सहआरोपी करण्यात आल्याची माहिती आहे. तो सध्या पोर्शे अपघात प्रकरणात गेल्या वर्षभरापासून येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. कोल्हापूरमधील एका महिलेला १५ लाख रुपयांचे आमिष दाखवून एका रुग्णाची पत्नी असल्याचे खोटे भासवण्यात आले. तिने एका तरुण महिलेला किडनी दान केली आणि त्याबदल्यात त्या तरुण महिलेच्या आईने मूळ पुरुष रुग्णाला किडनी दिली, अशी देवाणघेवाण पद्धतीने प्रत्यारोपण करण्यात आले. ही प्रत्यारोपण प्रक्रिया २९ मार्च २०२२ रोजी पार पडली. मात्र चार दिवसांनी संबंधित महिलेला पैसे न मिळाल्यामुळे तिने आपली खरी ओळख उघड केली. त्यानंतर रुग्णालयाने पोलिसांना माहिती दिली आणि हे प्रकरण उघडकीस आले. डॉ. अजय हा त्यावेळी किडनी प्रत्यारोपण विभागीय मान्यता समितीचा अध्यक्ष होता. त्याने किडनी देणारे आणि घेणारे दोघेही बनावट असल्याचे माहिती असतानाही त्यांची वैद्यकीय मुलाखत घेतली आणि खोट्या कागदपत्रांना मंजुरी दिली.

# यंदाही वारकऱ्यांना विमा कवच! व्हीआयपींच्या वाहनांना प्रवेशबंदी

■ मुंबई



## दिंडी मुक्कामस्थळी 'वॉटर प्रूफ' मंडप

**यंदाच्या** आषाढी वारीतील दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना मागील वर्षांप्रमाणे समूह विमा राहणार आहे. तसेच मानाच्या पालखी मधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचप्रमाणे आषाढी एकादशीला होणारी वारकऱ्यांची गर्दी लक्षात घेता व्हीआयपी वाहनांना प्रवेश बंदी राहील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर पोस्ट म्हटले आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अन्य मंत्रीगण तसेच मुख्य सचिव, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष यांच्यासह मानाच्या १० दिंड्यांचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. पुण्याच्या प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे वारीच्या तयारीची माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यंदा दिंडीतील वारकऱ्यांच्या ३६ ठिकाणच्या मुक्कामस्थळी वॉटर प्रूफ मंडप उभारले जातील. पुणे शहरात स्वागत मंडप आणि लाऊडस्पीकर राहील, प्रत्येक पालखीला पोलीस बंदोबस्त असेल. दिंडीतील वारकऱ्यांना यंदाही आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास विमा संरक्षण कवच मिळेल. या बैठकीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स पोस्टवर म्हटले की, यावर्षी वारकऱ्यांची होणारी विक्रमी गर्दी लक्षात घेता व्हीआयपींच्या वाहनांना प्रवेश बंदी लागू करण्यात आली आहे.

# पुण्यात डी.पी. रस्त्यावर वाहनांची तोडफोड

■ पुणे

**पुणे** शहरात किरकोळ कारणांवरून होणारी मारहाण, वाहने फोडण्याचे प्रकार आणि दहशत निर्माण करण्याचे प्रकार पुन्हा वाढताना दिसत आहेत. डी.पी. रस्त्यावर रात्री उशिरा तीन तरुणांनी एका कॅफेच्या बाहेर कोयते आणि धारदार शस्त्रे हवेत नाचवत दहशत माजवली. इतकेच नाही तर या तरुणांनी वाहनांची तोडफोड केली. या तोडफोडीचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला आहे. नागरिकांची वर्दळ असणाऱ्या भागात अशाप्रकारे वाहनांची तोडफोड केल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मळगांवमध्ये २ जूनपासून देव मायापूर्वचारी प्रतिष्ठापना

■ सावंतवाडी

**तालुक्यातील** सोनुर्ली- मळगांव येथील श्री देव मायापूर्वचारी व पंचायतन आणि परिवार देवतांचा पुनः प्रतिष्ठापना सोहळा २ ते ५ जून या कालावधीत आयोजित केला आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



यामध्ये २ जूनला सकाळी १० वाजता देवाला नारळ ठेवणे, देवांची संमती घेणे, प्रायश्चित, केशवपन, पंचगव्य होम, पंचगव्य प्राशन, प्रायश्चित विधान, महाप्रसाद आणि सांगता आदी धार्मिक कार्यक्रम होतील. ३ रोजी सकाळी ७.३० वाजता पुण्याहवाचन, संभारदान, मधुपर्क, आचार्यादि ब्राह्मण वरण, स्थलशुद्धी, देवांची महापूजा, तत्त्वचालन होम, तत्वोद्वार, पूर्णहुती, महाप्रसाद आणि सांगता आदी धार्मिक कार्यक्रम होतील. ४ जून रोजी सकाळी ११.३० वाजता स्थलशुद्धी, जलाधिवास, ज्ञानविधी, शय्याधिवास, पीठदेवता स्थापना, अग्नीस्थापना, वास्तुयजन, ग्रहयजन, पर्याय होम, महाप्रसाद आणि सांगता आदी कार्यक्रम होतील. ५ जून रोजी सकाळी ७ वाजता स्थलशुद्धी, देव उठवणे, तत्त्वन्यायहोम, तत्त्वन्यास व प्राणप्रतिष्ठा, देवतांचे महापूजा, बलिदान, पूर्णहुती, अभिषेक, आरती, मंत्रपुष्प, गाऱ्हाणे, ब्राह्मण पूजन, महाप्रसाद आणि सांगता आदी धार्मिक कार्यक्रम होतील. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोनुर्ले-मळगांव ग्रामस्थांनी केले आहे.

# अंबाजोगाई बस स्थानकात बसने प्रवाशाला चिरडले

■ बीड

**बीडच्या** अंबाजोगाईमध्ये बस स्थानकात सकाळी भीषण अपघात झाला. एका बसमध्ये चढत असताना दुसऱ्या बसने प्रवाशाला चिरडले. अंकुश मोरे हे प्रवासी बसमध्ये चढत असताना बाजूने येणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने त्यांना चिरडले. या दुर्घटनेत अंकुश मोरे यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बस स्थानकाच्या आवारातच घडल्याने इतर प्रवाशांमध्येही भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. चालकाच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशाचा मृत्यू झाल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

# अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत पुन्हा अडथळे

■ मुंबई

## विद्यार्थ्यांची व पालकांची प्रचंड गैरसोय

**अकरावीच्या** प्रवेशासाठी शिक्षण विभागाने स्वतंत्र संकेतस्थळ तयार करून ऑनलाइन प्रक्रिया सुरू केली आहे. पण सतत येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांची व पालकांची प्रचंड गैरसोय होत आहे. संकेतस्थळ सतत हँग होणे, सर्व्हर डाऊन होणे, पसंतीक्रम निवडताना वेळ लागणे आणि फी भरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे संपूर्ण प्रणालीच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२१ मेपासून प्रत्यक्ष अर्ज नोंदणी सुरू झाली पण अनेक विद्यार्थ्यांना प्रक्रिया पूर्ण करता आलेली नाही. तांत्रिक कारणामुळे संकेतस्थळ २५ मेपर्यंत बंद ठेवण्यात आले होते. त्यानंतर राज्य शिक्षण महामंडळाने सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार सोमवार पासून ऑनलाइन प्रवेश सुरु झाले. पण प्रत्यक्षात ऑनलाइन अर्ज पुढे सरकत नाही, असा अनुभव विद्यार्थ्यांना येतो आहे. अर्ज नोंदणी करताना येणाऱ्या अडचणींमुळे पालक व विद्यार्थी वैतागले आहेत. पसंतीक्रम शोधणे कठीण होत आहे कारण प्रत्येक महाविद्यालयासाठी विभाग वेगळा निवडावा लागतो. मात्र, पालकांना प्रत्येक महाविद्यालयाचा विभाग माहीत असणे शक्य नाही.

ग्रामीण भागात नेटवर्क व संकेतस्थळ खूप संथगतीने सुरू असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरता आलेला नाही. सायबर कॅफेवर फॉर्म भरण्यासाठी जास्तीचे शुल्क घेऊन आर्थिक लूट केली जात आहे. त्यामुळे अनेक पालकांनी शिक्षण विभागाकडे ऑनलाइन प्रक्रिया थांबवून ऑफलाइन अर्ज प्रणाली सुरू करण्याची मागणी केली आहे.

# पुण्यात भाजपा आमदाराच्या घरात घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्याला अटक

■ पुणे

**पुण्यातील** खडकवासला मतदारसंघातील भाजपा आमदार भीमराव तापकीर यांच्या घरात शंकर धुमाळ या व्यक्तीने तीन वेळा घुसण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी सहकार नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून शंकर धुमाळला अटक करण्यात आली. आमदार भीमराव तापकीर यांच्या घराजवळ शंकर धुमाळ हा व्यक्ती वारंवार जाऊन गोंधळ घालत होता. त्याने तीन वेळा आमदारांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न केला. त्याला रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांना त्याने शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी आमदारांच्या सुरक्षेसाठी नेमण्यात आलेले सुरक्षा कर्मचारी अजित देवघरे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तेव्हा आरोपीवर किरकोळ स्वरुपाची कारवाई करण्यात आली. पण त्यानंतरही त्याने घरात घुसण्याचा प्रयत्न केला आणि शिवीगाळ करत धमक्या देत राहिला.

# ५ वर्षांपूर्वी बंद पडलेल्या गिरण्या खासगीकरणातून पुन्हा सुरू करा

■ मुंबई

## एनटीसी कामगार संघटनांची मागणी

**एनटीसी** म्हणजेच राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या २२ गिरण्यांमधील कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांनी पाच वर्षांपूर्वी बंद पडलेल्या गिरण्या पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. गिरण्या बंद असल्याने या कामगारांचे हाल होत आहेत, असे संघटनेच्या नेत्यांनी म्हटले आहे.

देशभरात २२ एनटीसी गिरण्यांच्या राष्ट्रीय समन्वय कृती समितीचे प्रमुख असलेले शिवसेना उबाठा पक्षाचे विधान परिषदेचे सदस्य सचिन अहिर म्हणाले की, या गिरण्या खासगीकरण करून किंवा सरकारी-खासगी उपक्रम म्हणून सुरू केल्या जाऊ शकतात. कोविड प्रादुर्भावामुळे २०२० मध्ये बंद पडलेल्या गिरण्या अद्याप सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे २० हजारहून अधिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना अत्यंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामध्ये मुंबईतील टाटा, इंदू नं.५,पोदार, दिग्विजय आणि अचलपूरमधील बार्शी टेक्सटाईल व फिनले टेक्सटाईल या महाराष्ट्रातील सहा गिरण्यांचा समावेश आहे.या गिरण्यांमध्ये २ हजार ते ३ हजार कामगार कार्यरत आहेत. ज्या नऊ राज्यांमध्ये एनटीसी गिरण्या आहेत त्या राज्यातील कामगार संघटनांनी एकत्र येऊन राष्ट्रीय समन्वय कृती समितीची स्थापना केली आहे.जेणेकरून या गिरण्या पुन्हा सुरू कराव्या यासाठी दबाव आणता येईल.या गिरण्या पुन्हा सुरू कराव्यात आणि कामगारांना पूर्ण पगार द्यावा अशी आमची मागणी आहे.आमच्या निषेधामुळे सरकारने अर्धे पगार देण्याचे मान्य केले होते. परंतु तेही गेल्या आठ महिन्यांपासून प्रलंबित आहेत. सचिन अहिर असेही म्हणाले की,गेल्या चार वर्षांत कामगारांना प्रलंबित २ कोटी रुपयांपेक्षा जास्त बोनस अद्याप देण्यात आलेला नाही. सरकार गिरण्यांचे खासगीकरण करण्याचा किंवा त्यांना सरकारी-खासगी संयुक्त उपक्रम म्हणून चालवण्याचा विचार करू शकते. गिरण्यांची मालमत्ता ५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

या गिरण्या एकेकाळी सरकारी रुग्णालये आणि संस्थांमध्ये वापरता येणारे कापड तयार करत असत, त्यामुळे त्यांचे अस्तित्व सुनिश्चित होते.जर केंद्राने मुंबईच्या एनटीसी मिलमधून निर्माण होणारा हस्तांतरणीय विकास हक्क निधी राज्याकडे हस्तांतरित केला असता, तर कामकाज पुन्हा सुरू होऊ शकले असते.

Admission Open for 1st & Direct 2nd Year
DEVI MAHALAXMI COLLEGE, TITWALA
(ALL COLLEGES / COURSES RECOGNIZED BY GOVT. OF MAHARASHTRA)
Near Ganesh Temple, Mhaskal, Titwala (East)
M. 9322205346 / 8928593495 / 8591220450 / 9320103004
9321948752 www.dmgi.in SUNDAY ALSO OPEN
1) POLYTECHNIC (FC Centre) (Approved by AICTE & Affiliated to MSBTE)
• Civil • Electrical • Mechanical • Computer
• Electronic & Tele. • Information Technology
2) DEGREE COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY (Approved by AICTE & Affiliated to MU) FC Centre
• Civil • Electrical • Mechanical
• Computer • Computer Science (AI & ML)
3) COLLEGE OF PHARMACY (Approved by PCI) FC Centre
• B Pharm • D Pharm
4) COLLEGE OF ART, SCIENCE & COMMERCE (Affiliated to Mumbai University)
• BSc (Computer) • BSc (IT) • BA
• B.Com (Accounts & Finance)
5) OTHER COURSES (MSBTE)
• Medical Lab Technology (ADMLT) • Fire Engg (FR)
• Fees in Installment • Scholarship • For Enquiry Free Pick Up
• FREE Bus from Titwala Station • Sunday Spl. Coaching
DEVI MAHALAXMI COLLEGE, VIKROLI
Recog. By Govt. of Maharashtra, MSBTE, YCMOU
ADV. DIPLOMA & DIPLOMA COURSES
• A.D.M.L.T (PATHOLOGY) FEES- 30 K
• B. Voc (3 Yrs) • FF (Fire & Security)
• Adv Dip in Environmental Engg-EZ
• D.M.L.T. • X-RAY-ECG-CT SCAN
• Post Diploma in Fire Engg. FI (Graduate)
Add. : - 6th floor, Varsha Nagar BMC school, Vikroli-Powai link road, Vikroli west, Mumbai 400079
Tel. 9321121625 / 9322505346 / 9321948752 / 9137437548 SUNDAY ALSO OPEN

# लातुरात चोरट्याचा धुमाकूळ! वृद्ध पती-पत्नीची हत्या

■ लातूर

**रेणापूर** तालुक्यातील गरसुळी येथील शेतात राहणाऱ्या वयोवृद्ध दाम्पत्याची हत्या करून दागिने लंपास करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी गजाआड केले आहे. या घटनेत चोरट्याने अत्यंत क्रूरपणे अर्धांगवायू झालेल्या वृद्धाला विहिरीत फेकले, तर वृद्ध महिलेच्या डोक्यात कुकर घालून, दगडाने ठेचून तिची हत्या केली. रावसाहेब कातळे (६०) व त्यांची पत्नी पुष्पलता रावसाहेब कातळे (५२) अशी हत्या केलेल्या वृद्ध दांपत्याची नावे आहेत. हे दोघेही गावालगत स्वत:च्या शेतात राहत होते. रावसाहेब यांना अर्धांगवायू असल्याने ते अंथरुणावरच होते. त्यांचा एकुलता एक मुलगा कामानिमित्त हैदराबाद येथे राहतो.

दरम्यान, दोघेच वयोवृद्ध राहत असल्याचा अंदाज घेऊन २५ ते २७ मे दरम्यान चोर शेतात आला. तो चोरी करीत असताना पुष्पलता यांनी विरोध केला. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या डोक्यात कुकर घातला आणि दगडाने प्रहार करून ठार मारले. अंथरुणावर पडलेले रावसाहेब कातळे यांनी हा प्रकार पाहिला असता चोरट्याने रावसाहेब यांनाही मारहाण करून उचलून शेताशेजारी असलेल्या काकासाहेब पवार यांच्या विहिरीमध्ये फेकून दिले. पवार यांच्या शेतातील नोकर तण काढण्यासाठी शेतात फिरत असताना विहिरीकडे गेला. त्यावेळी त्याला विहिरीत मृतदेह तरंगताना आढळला.



# तळ्याची वाडी पाण्याचे गोकुळ

निसर्ग हा चैतन्याचा साक्षात्कार असतो. सृष्टीचे सर्व प्रकारचे हे सृजन मनुष्याच्या मनाला अनन्यपणे भुरळ घालते. देहभान विसरून खऱ्या अर्थाने मन तिथे विसावते. म्हणूनच तिथे चैतन्य अवतीर्ण होत असावे. अगदी बालकवींसारखा कवीसुद्धा असे म्हणतो,

सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनी घ्यावे,
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे,

बा. भ. बोरकरही याच चैतन्याचे रसिक होते. त्यांनीदेखील आपल्या काव्याचे रहस्यच हा निसर्ग असल्याचे सांगून टाकले.

हिरवळ आणिक पाणी तिथे स्फूरती मजला गाणी,

निसर्गाचा हा आविष्कार ज्याला रसरसून अनुभवता येतो. त्याला निश्चितच चैतन्याचा साक्षात्कारही अनुभवता येईल यात काही शंका राहात नाही. इथल्या डोंगरदऱ्या, ओढे, नद्या, यातून जाणवणारा निसर्ग हा तर एक भाग झाला. परंतु वेगवेगळ्या पद्धतीने निसर्गाशी जोडून घेण्याचा प्रयत्न आणि शेतीच्या माध्यमातून निसर्गाचीच होणारी ही पाद्यपूजा एकूणच मानवी संस्कृतीच्या आद्यतेचीच साक्ष देत असते. शेती असो, शेतीला लागणारे पाणी असो त्या पाण्याशी जोडली गेलेली विविध प्रकारची जीवसृष्टी असो या सर्वांच्या एकत्रितपणाचा आनंद निर्माण करता येतो आणि अनुभवताही येतो. अशी सृष्टी जोपासण्याची दृष्टी जर लाभली तर एखादे गावच आकाराला येऊ शकते. नाशिकपासून जवळच असलेल्या महिरावणी गावाला लागून तळ्याची वाडी याच नावाचे एक गावही हळुहळू आकाराला येत आहे. जे केवळ शेतीची उपासना, निसर्गाची जोपासना आणि जीवसृष्टीची आराधना करणारे आहे. पाण्याशिवाय शेती नाही. पण शेत तिथे पाणी निर्माण करण्याचा आगळावेगळा प्रयोग गोपाळ पाटील या व्यक्तिमत्वाने नाशिक जवळच्या महिरावणी भागात तळ्याची वाडी या संकल्पनेतून साकारला आहे. महाराष्ट्रात अलिकडेच जलसंधारण पंधरवडा पाळला गेला. ज्यामध्ये प्रामुख्याने पाणी वाचवा पाणी साठवा आणि असलेल्या पाण्याच्या वाटपाचे योग्य नियोजन यावर भर दिला गेला होता. गेल्या दहा वर्षांपासून महाराष्ट्रात जलयुक्त शिवाराचा कार्यक्रम राबवला जातो आहे. आपला गाव, परिसर किंबहुना जिथे जिथे जलाचा स्त्रोत असेल तिथले सगळे शिवार तळी तयार करून जलयुक्त करण्याचा तो एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम मानला गेला. सरकारी पातळीवर त्याला किती यश आले हा सर्वविदीत विषय आहे. परंतु तळ्याची वाडी हा व्यक्तिगत स्तरावरचा प्रयोग जलयुक्त शिवारच नव्हे तर परिसर निर्माण करणारा ठरतो.

**जलयुक्त शिवार नव्हे परिसर**

सरकारने प्रयत्न करणे तो त्यांच्या जबाबदारीचा किंवा कर्तव्याचाही भाग ठरू शकतो. परंतु मुळात जिथे जिथे पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होईल ती ती शिवारे सहस्त्रपटीने जलयुक्त होऊ शकतात. याचे ज्वलंत आणि उत्तम उदाहरण म्हणजे गोपाळ पाटील यांच्या या तळ्याच्या वाडीचे देता येईल. पाण्याचा छोटासा स्त्रोत अनेक तळी निर्माण करणारा ठरू शकतो. हे त्यातून विशेषत्वाने जाणवते. मुळातच गोपाळ पाटील हे शेतकरी पुत्र असल्याने शेती करण्याची मनस्वी आवड किंबहुना पाणी आणि शेती या दोघांचे नाते साकार करण्याची तळमळ त्यांच्यामध्ये होती. ज्या मातीत अंकुर फुटतात तिथे निश्चितच जलथळे सोबतीला असतात. आपण वृक्षारोपणाची नेहमीच भलामण करतो. परंतु वृक्षारोपणाबरोबर जलरोपणही होऊ शकते. हे गोपाळ पाटील यांनी या माळरानावर सिद्ध करून दाखवले. केवळ दोन वृक्षांच्या सोबतीने आज हिरवेगार रान तिथे तयार केले आहे. शेकडो वृक्ष तिथे आहेतच. आकाशातल्या नक्षत्रांची नावे प्रत्यक्ष धरतीवर साकार करण्याचा कल्पक प्रयोग नक्षत्रांची बाग या संकल्पनेतून त्यांनी साकारला आहे. शेकडो वृक्ष लावल्याने अनेक पक्षांना घरटी मिळाली. पाण्याचा आश्रय असल्याने कितीतरी नवीन पक्षी तिथे विसाव्याला आले. वृक्ष भलेही आपल्याला सावली देत असतील, परंतु ज्या मातीतून हे वृक्ष उगवतात त्या मातीला पाण्याचीच सावली हवी असते. याच पाण्याच्या छत्रछायेला गोपाळ पाटील यांनी तळ्याची वाडी असे सार्थ नाव दिले. अनेक वृक्षांना, अनेक पक्षांना आणि अनेक तुमच्या आमच्यासारख्या पांथस्थांना दिलासा देणारा हा विसावा पाहिला की ही तळ्याची वाडी म्हणजे वृक्षांच्या सावलीतले आकाशदिवे वाटू लागतात.

**जलपुनर्भरणाचा वेगळा प्रयोग**

अशीच एक भन्नाट कल्पना गोपाळ पाटील यांच्या मनात आहे. ती म्हणजे प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या वृक्षांचे एकत्रित संवर्धन करून राष्ट्रीय एकात्मता वन निर्माण करण्याचा त्यांचा संकल्प आहे. शेती असो किंवा वृक्षारोपणासारख्या उपक्रमांबाबत केवळ बोलघेवडेपणा न करता प्रत्यक्ष कृती करून दाखवता येते हे या उदाहरणावरून लक्षात येते. आपण सगळेच जण राष्ट्रीय एकात्मतेच्या गप्पा करीत असतो. परंतु प्रत्यक्षात या राज्यांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन या राज्यांबरोबरचा संबंध दृढ करता येऊ शकतो. पण आपल्याच देशातल्या अनेक राज्यांमध्ये इतके अनोखे आणि अनेक विलोभनीय वृक्ष असतात की ते त्या त्या राज्याची ओळख देतात. अशा त्या त्या राज्यातील अनेक वृक्षांना एकाच ठिकाणी संवर्धित करण्याचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रयोग करण्याची पाटील यांची कल्पकताही वैशिष्ट्यपूर्ण ठरते. अशा अनेक दृष्टीकोनातून तळ्याची वाडी हा प्रयोग शेतीकडे, वृक्षारोपणाकडे आणि एकूणच पाण्याच्या संवर्धनाकडे नवी दृष्टी देणारा प्रयोग ठरतो. खरे तर आजच्या स्टार्टअपच्या युगामध्ये तरुणांना तळ्याची वाडी या उपक्रमातून खूप नवीन गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत. अगदी राज्य सरकारनेसुद्धा पाण्याच्या संवर्धनाची एक वेगळी कल्पना म्हणून तळ्याची वाडीकडे बघितले पाहिजे. पावसाचे वाहून जाणारे पाणी ठिकठिकाणी जर योग्य पद्धतीने अडवले गेले तर वृक्षांच्या सहवासात पक्षी आणि माणसं शिवाय इतर जीवसृष्टीसुद्धा सुखाने नांदू शकते. जीवसृष्टीच्या निवासाची एकत्रित व्यवस्था म्हणूनही तळ्याच्या वाडीकडे पाहता येते. दुधाचंच गोकुळ असतं असं नव्हे तर पाण्याचंही गोकुळ निर्माण करताना पाटील यांचे गोपाळ नावही सार्थ ठरते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**मन आणि छत्री यांचा उपयोग तेव्हाच होतो जेव्हा ते उघडले जातात. नाहीतर ते ओझे कायम बाळगावे लागते.**

## पंचांग

**शुक्रवार, ३० मे, २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी**
**नक्षत्र : पुनर्वसू**



**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-११**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १५-४२ मिथुन**
**१५-४३ ते २४-०० कर्क**

**विनायक चतुर्थी; गुरू अर्जुनदेव शहीद दिन; गोवा राज्य दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### पनीर कॉर्न सँडविच



★ **साहित्य :-** दोन ब्रेडचे तुकडे, १०० ग्रॅम पनीर, एक कप- कॉर्न, दोन चमचे- मेयोनेझ, दोन चमचे- शेझवान सॉस, दोन चमचे- बटर, अर्धा चमचा- ओरेगॅनो, अर्धा चमचा- चिली फ्लेक्स, चवीनुसार मीठ, चिमूटभर मिरे पूड, कांदा, चीज, टोमॅटो, काकडीचे तुकडे

★ **कृती :** सर्वात आधी पनीर घ्या आणि ते चांगले मॅश करा. आता पनीर बाजूला ठेवा. गॅस चालू करा आणि कॉर्न उकळवा. कॉर्न उकळत असताना, कांदे, टोमॅटो आणि काकडी स्वच्छ पाण्यात धुवा आणि या भाज्या बारीक चिरून घ्या. कॉर्न उकळल्यावर ते गाळून थंड पाण्यात ठेवा. आता सर्व चिरलेल्या भाज्या आणि कॉर्न मॅश केलेल्या पनीरमध्ये मिसळा. या मिश्रणात अर्धा चमचा चाट मसाला आणि चवीनुसार मीठ घाला. आता २ ब्रेड घ्या आणि एका ब्रेडच्या स्लाईसवर २ चमचे मेयोनेझ आणि दुसऱ्या ब्रेडच्या स्लाईसवर शेझवान चटणी लावा. त्यानंतर, चीज कॉर्नचे मिश्रण ब्रेडवर लावा आणि त्यावर चिमूटभर मिरे पूड, ओरेगॅनो आणि मिरचीचे तुकडे घाला. वरून चीजही घाला. आता ब्रेडचा दुसरा स्लाईस वर ठेवा. आता ब्रेड सोनेरी तपकिरी आणि कुरकुरीत होईपर्यंत सँडविच ग्रिल किंवा टोस्ट करा. आपले पनीर कॉर्न सँडविच तर तयार आहे.



# रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची अंतिम सामन्यात धडक

## सुयश, हेझलवुडच्या माऱ्यामुळे पंजाबचा लाजिरवाणा पराभव

**फिरकीपटू सुयश शर्मा (३ गडी) आणि वेगवान गोलंदाज जोश हेझलवुड (३गडी) यांच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर आयपीएलच्या क्वालिफायर १ च्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्जवर ८ गडीने एकतर्फी विजय मिळवत अंतिम सामन्यात धडक मारली. मुल्लानपूरच्या महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आज झालेल्या या सामन्यात पंजाबने बंगळुरूसमोर विजयासाठी फक्त १०१ धावांचे आव्हान दिले होते.ते बंगळुरूच्या संघाने १० षटकांत सहज पूर्ण केल्यामुळे पंजाबवर लाजीरवाणा पराभवाचा नामुष्की ओढावली.**



■ मुल्लानपूर

**बंगळुरूचा** कर्णधार रजत पाटीदारने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.त्याचा हा निर्णय बंगळुरूच्या गोलंदाजांनी सार्थक ठरवला. मार्कस स्टोइनिस वगळता एकाही पंजाबच्या फलंदाजांना २०चा आकडा गाठता आला नाही. सलामीवीर प्रियांश आर्याने संघासाठी ७ धावा करुन झेलबाद झाला.त्याला यश दयालने बाद केले. प्रभसिमरण १८ धावांवर खेळत असताना भुवनेश्वर कुमारने त्याला बाहेरचा रस्ता दाखवला. जोश इंग्लिश (४) देखील फेल ठरला. त्याला हेझलवूडने पव्हेलियनचा रस्ता दाखवला. पंजाबचा कर्णधार श्रेयस देखील काही विशेष कामगिरी करू शकला नाही. तो २ धावा करून बाद झाला. नेहल वढेर १० चेंडूमध्ये ८ धावा करून बाद झाला. शशांक सिंगने ५ चेंडूमध्ये फक्त ३ धावा केल्या. त्याला सुयश शर्माने बाहेरचा रस्ता दाखवला. इम्पॅक्ट प्लेयर म्हणून मुशीर खान हा फलंदाजीला आला. तो तिसऱ्याच चेंडूवर एकही धाव न करता आऊट झाला. संघाचा डाव सावरत असताना मार्कस स्टोइनिसचा सुयश शर्माने त्रिफळा उडवला. त्याने १७ चेंडूंत १७ चेंडूंत २ षटकार आणि २ चौकार २६ धावा केल्या. त्यानंतर अझमतुल्लाह (१८ चेंडूंत १२ धावा) आणि हरप्रीत ब्रार (११ चेंडूंत ४ धावा) यांनाही फारसे योगदान देता आले नाही. त्यामुळे पंजाबने १४.१ षटकांत सर्वबाद १०१ धावा केल्या. सुयश शर्माने ३ गडी, वेगवान गोलंदाज जोश हेझलवुडने ३ गडी, यश दयाळने २ गडी बाद केले.

पंजाबने दिलेल्या १०१ धावांचा पाठलाग करणाऱ्या बंगळुरुने १० षटकांत २ बाद १०६ धावा केल्या. त्यामुळे बंगळुरुने पंजाबवर ८ विकेटने एकतर्फी विजय मिळवला. कोहलीने १२ धावा, फिल सॉल्टने नाबाद ५६ धावा आणि मयंक अग्रवालने नाबाद १९ धावा, रजत पाटीदारने १५ धावा केल्या.

# आज मुंबई आणि गुजरातमध्ये लढत

■ मुल्लानपूर

पंजाबच्या मुल्लानपूरच्या महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये उद्या होणारा आयपीएलचा एलिमिनेटर सामना गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे. 'करो या मरो' सारखा असलेल्या सामन्यात पराभूत झालेल्या संघाला स्पर्धेतून गाशा गुंडाळावा लागेल. तर विजयी संघ क्वॉलिफायर २ फेरीत खेळेल.

आयपीएलमध्ये आतापर्यंत गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स हे संघ ७ वेळा एकमेकांसमोर आले आहेत. गुजरात टायटन्सने ७ पैकी ५ सामने जिंकले. तर मुंबई इंडियन्सने दोन सामने जिंकले. परिणामी आतापर्यंत गुजरात टायटन्सचा येथे वरचष्मा आहे. दोन्ही संघ शेवटचे या हंगामात एकमेकांसमोर आले होते. त्यात गुजरातने मुंबईचा ३६ धावांनी पराभव केला होता. त्या सामन्यात गुजरातने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून १९६ धावा केल्या. प्रत्युत्तरात मुंबईला ६ विकेट गमावून फक्त १६० धावा करता आल्या होत्या. गुजरात टायटन्सने गेल्या चार हंगामात तिसऱ्यांदा प्लेऑफमध्ये स्थान मिळवले आणि २०२२ मध्ये पदार्पणातच गुजरातने विजेतेपदही जिंकले होते.

# पालघरमध्ये शनिवार-रविवारी पॉवरलिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा

■ पनवेल

**महाराष्ट्र** राज्य सीनियर,सब ज्युनिअर, ज्युनिअर, मास्टर्स १,२,३,४ गट पुरुष आणि महिला पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा पालघरमध्ये होणार आहे. महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आणि पालघर जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या वतीने होणारी ही स्पर्धा ३१ मे आणि १ जून या कालावधीमध्ये लायन्स क्लब हॉल, रस्सम हॉटेलसमोर, कचेरी रोड, पाच बत्तीजवळ, पालघर येथे होणार आहे.

या स्पर्धेतून २२ ते ३० जून या कालावधीत दावणगिरी-कनटक या ठिकाणी होणाऱ्या वरिष्ठ, सब ज्युनियर, ज्युनिअर राष्ट्रीय (पुरुष व महिला) पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठीचा महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे.

# कॅरम स्पर्धेत सार्थक केरकर अजिंक्य

■ मुंबई

**अमृत** महोत्सवी गोविंदराव मोहिते चषक विनाशुल्क राज्यस्तरीय शालेय कॅरम स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालयाचा सार्थक केरकर अजिंक्य ठरला. चुरशीच्या अंतिम सामन्यामध्ये सार्थक केरकरने अचूक खेळासह राणीवर सतत कब्जा मिळवित राष्ट्रीय ख्यातीची सबज्युनियर कॅरमपटू तनया दळवीचा १०-५ असा पराभव केला. जिंकलेल्या बोर्डात राणी हुकल्यामुळे महात्मा गांधी विद्यामंदिरच्या तनया दळवीला अखेर अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. परेल येथील आरएमएमएस सभागृहात अटीतटीमध्ये रंगलेल्या उपांत्य सामन्यात ६-० असा दमदार प्रारंभ करणाऱ्या चेंबूर हायस्कूलच्या मयुरेश पवारला सार्थक केरकरने १२-६ असे नमविले तर डावाच्या उत्तरार्धापर्यंत १०-७ अशी आघाडी घेणाऱ्या महावीर जैन हायस्कूल-कल्याणच्या संचिता मोहितेला तनया दळवीने १२-१० असे चकविले.

## ई-निविदा सूचना

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई कार्यालयासाठी सोशल मिडीयावर प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी ई-निविदेद्वारे सोशल मिडीया एजन्सीची नियुक्ती करणे.

| कामाचे स्वरूप | कामाची रक्कम अंदाजित | निविदा कालावधी |
|---|---|---|
| सोशल मीडियावर प्रचार व प्रसिद्धी | रु. २,७०,६०,०००/- | दि. ३०.०५.२०२५ ते दि. १६.०६.२०२५ पर्यंत |

निविदा दस्तऐवज संबंधित सर्व माहिती प्राधिकरणाच्या www.sra.gov.in आणि www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

क्र. झोपुप्रा/ जनसंपर्क विभाग/टे-१/२७६/२०२५
दि. २९.०५.२०२५

सही/-
सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

## जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेस येथे कळविण्यात येत आहे की, **श्री.शब्बीर ताहेरअली चेचाटवाला** हे कार्यालय क्र.२०८ मोजमाप क्षेत्र सुमारे १७७.५३ चौरस फूट (कार्पेट क्षेत्र) दुसरा मजला, मांडवी नवजीवन प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, १२/१२७ काझी सय्यद स्ट्रीट, खांड बाजार मस्जिद स्टेशन जवळ मुंबई-४००००३ चे मालक यांनी कार्यालय क्र.२०८ चे खालील मूळ कागदपत्रे हरवली आणि/किंवा गहाळ केली आहेत.
१) मे.सोमैया कन्स्ट्रक्शन कंपनी आणि मे.नोबल केमिकल्स यांच्यात निष्पादित दि.२८.०६.१९७३ रोजीचा विक्री करार.
२) मे.नोबल केमिकल्स आणि श्री.किर्तीकुमार उदयशंकर पंड्या, **श्री. शब्बीर ताहेरअली चेचाटवाला** यांच्यात निष्पादित दि.२३.०९.१९७५ रोजीचा विक्री करार यांनी २८.०५.२०२५ रोजी डोंगरी पोलिस ठाण्यात हरवलेला अहवाल क्र.६६०४७/२०२५ केला आहे.
जर कोणा व्यक्तिस वरील कागदपत्रे/करार किंवा त्यापैकी कोणतेही कागदपत्रे आढळली तर त्यांना विनंती आहे की त्यांनी ते खालील पत्त्यावर वरील व्यक्तीला द्यावेत.

**श्री. शब्बीर ताहेरअली चेचाटवाला**
खोली क्र.५, १ला मजला, जे जे हॉस्पिटल गेट क्र.६ समोर, उमरखाडी मुंबई ४००००९
दिनांक: ३० मे २०२५
ठिकाण: मुंबई

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील सदनिका क्र. ई/१, ४ था मजला, संगम भवन ("सदनिका") चे मालक सौ. प्रभा परिमल शाह आणि श्री. ऋषभ परिमल शाह यांच्याशी याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या आणि सदनिका व त्यासह आणि संगम भवन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड ("संस्था") च्या प्रमाणपत्र क्र. २८ धारण केलेल्या समभागांमध्ये समाविष्ट ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेल्या समभागांमधील ("समभाग") त्यांचे हक्क आणि लाभार्थी हितसंबंध खरेदी आणि संपादित करण्याकरिता बोलणी करीत आहेत;
कोणा व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदनिका, समभागांमध्ये करारपत्र (मौखिक किंवा लेखी), हमी, व्यवस्था, विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांतरण, अभिहस्तांकन, प्रभार, गहाणवट, भेट, न्यास, भाडेपट्टी, मासिक भाडेकरू, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भागिदारी, संयुक्त उपक्रम, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, ताबा, जुन्या वहिवाटीचा अधिकार, कोणताही प्रतिकूल अधिकार, शीर्षक, हितसंबंध, किंवा कोणत्याही स्वरुपाचा दावा, विवाद, खटला, हुकूम, आदेश, प्रतिबंधात्मक करार, मनाई हुकूम, जप्ती, संपादन, मागणी या मार्गे किंवा अन्यथा समाविष्ट असलेल्या कोणत्याही पद्धतीने कोणताही कायदेशीरदृष्ट्या सक्षम हक्क, शीर्षक, हितसंबंध किंवा दावा असल्यास त्यांनी त्याबाबत सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत वैध कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांच्या पत्त्यावर म्हणजेच खोली क्र. २९, २रा मजला, बॉम्बे म्युच्युअल चेंबर्स, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे एकतर योग्य लेखी पोचपावती घेऊन निम्नस्वाक्षरीकारांना हाती पोहोच करावे किंवा फक्त रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.द्वारे पाठवावी, असे न केल्यास कोणताही दावा सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल आणि त्यानंतर बोलणी पूर्ण झाल्यावर उपरोल्लेखित पक्षकारांच्या पर्यायानुसार व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

ब्रह्मकुमारी मार्ग, कुलाबा, मुंबई - ४००००५ येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या कुलाबा विभाग, मुंबईचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ५०७ धारण केलेल्या प्लॉटवर बांधलेल्या/उभ्या "संगम भवन" या इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील सदनिका क्र. ई/१, मोजमाप अदमासे ९८० चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह संगम भवन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडचे भाग प्रमाणपत्र क्र. २८ धारण केलेल्या प्रति भाग दर्शनी मूल्य रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) च्या ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेल्या समभागांमधील सर्व हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावे आणि लाभार्थी हितसंबंध.

दिनांक २९ मे, २०२५

श्री. प्रकाश डी. गोरिया
वकील, उच्च न्यायालय मुंबई
खोली क्र. २९, दुसरा मजला, बॉम्बे म्यूच्युअल चेंबर्स, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१. दूरध्वनी - २२६४ २०२४, मोबाईल ९८२०१ ९५३७५

## जाहीर सूचना

जनतेला कळविण्यात येते की, निवासी खोली क्र.२६, २ऱ्या मजल्यावर, सोनापूर/दुधवाला इमारत म्हणून ज्ञात इमारत, चंदनवाडी, मुंबई ४०० ००२ च्या बाबतीत सुश्री मोनिका डेनिस भाडेकरू होत्या. ट्रस्टकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर श्रीमती मोनिका डेनिस यांचे १५ मे २०२५ रोजी निधन झाले, त्यांचे कोणतेही वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी नव्हते कारण त्या तिच्या हयातीत अविवाहित होत्या.
तिच्या निधनानंतर सदर खोली कुलूपबंद आणि वापरात नाही आणि सदर खोली अतिक्रमण/हडप/कब्जा होण्यापासून वाचवण्यासाठी, सदर इमारतीच्या घरमालकांच्या भूमिकेत अधोस्वाक्षरीकर्त्यांनी सदर खोली ताब्यात घेतली आहे आणि/किंवा अतिक्रमण किंवा बेकायदेशीर कब्जा रोखण्यासाठी आणि/किंवा संरक्षण करण्यासाठी सदर खोलीला अतिरिक्त कुलूप लावले आहे.
कोणा व्यक्ती किंवा व्यक्तिस सुश्री मोनिका डेनिस मार्फत किंवा कोणत्याही क्षमतेत सदर कक्षात कोणताही दावा केला असेल तर त्यांनी प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याच्या कागदोपत्री पुराव्यांसह अधोस्वाक्षरीकर्त्याशी संपर्क साधावा, असे न केल्यास, जर काही दावे असतील तर ते माफ केले गेले आहेत असे मानले जाईल आणि त्यांचा विचार केला जाणार नाही.
दिनांक: ३० मे २०२५.
ठिकाण: मुंबई

**दाऊदभाय फजलभॉय मुस्लिम एज्युकेशन ट्रस्ट**
४२ आय. एम. एम. रोड, खडक
मुंबई ४०० ००९

## जाहीर सूचना

आमचे अशिल महावीर राजमल गादिया आणि इतर यांनी याद्वारे कळविले आहे की, दिवंगत कुवेरबाई वेलजी छेडा यांचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी म्हणजे - (१)श्री. छेडा योगेश प्रेमजी (२)श्री. राजेश प्रेमजी छेडा (३)श्री. जयंतीलाल वेलजी छेडा (४)श्री.मंगल वेलजी छेडा आणि (५)श्री.मोरारजी वेलजी छेडा यांनी ११६, भुलेश्वर रोड मुंबई-४००००२ येथे असलेल्या महावीर सदन या नावाने ज्ञात इमारतीमधील दिवाणखाना क्र.३, ४, आणि खोली क्र.५ चे भाडेकराराचे अधिकार श्री. मोरारजी वेलजी छेडा आणि इतर यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी आमच्या अशिलांशी संपर्क साधला आहे. दि.८ ऑगस्ट २००६ च्या घोषणेनुसार, दिवंगत कुवेरबाई वेलजी छेडा यांच्या तीन मुलींनी त्यांचे भाडेपट्टा हक्क त्यांच्या चार भावांच्या नावे सोडले आहेत आणि हस्तांतरित केले आहेत, अशी माहिती देखील देण्यात आली आहे.
कोणा व्यक्तिस सदर खोली क्र.३, ४, ५ मध्ये दिवंगत श्रीमती कुवेरबाई वेलजी छेडा यांच्यामार्फत किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांद्वारे किंवा कोणत्याही स्थितीत याद्वारे कोणत्याही स्वरूपाचा दावा असल्यास त्यांना विनंती केली जाते की त्यांनी या सूचनेच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत पुरावा/साक्ष म्हणून सहाय्यक कागदपत्रांसह त्याचा/त्यांचा दावा अधोस्वाक्षरीकृत व्यक्तीकडे सादर करावा, अन्यथा, त्यानंतर प्राप्त झालेला दावा माफ मानला जाईल आणि आमचे अशिल भाडेपट्टा हस्तांतरण करण्यास पुढे जातील.
दिनांक: ३० मे २०२५
ठिकाण: मुंबई

**पटेल असोसिएट्स**
**सज्जाद एच पटेल वकिल उच्च न्यायालय**
कार्यालय क्र.४/५ तळमजला
४० ई एम एम रोड, खडक, मुंबई ४०० ००९

## फॉर्म जी
## मुंबई, महाराष्ट्र येथे मालमत्ता भाडेपट्ट्याने देणे यामध्ये कार्यरत, ईसकृपा मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड करिता स्वारस्य अभिव्यक्तींचे आमंत्रण

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६(ए) च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन आणि सीआयएन /एलएलपी क्र. | ईसकृपा मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन क्र.: U70100MH2005PTC151439 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | पॅन्टालून नॉलेज हाऊस, श्याम नगर, ऑफ जोगेश्वरी - विक्रोळी लिंक रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०००६०. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | - |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | कंपनीचा मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याचा व्यवसाय आहे. अधिक तपशिलाकरिता, irp.iskrupa@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनी कार्यरत नाही. (स्थावर मालमत्ता नाहीत) |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | शुन्य |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, त्यानंतरच्या घटनांकरिता संबंधित दिनांक समाविष्ट असलेल्या पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएल: | अधिक तपशिलाकरिता, irp.iskrupa@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराच्या पात्रता उपलब्ध असलेले यूआरएल: | तपशिलवार ईओआय आणि पात्रता निकषाकरिता, irp.iskrupa@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | १४ जून, २०२५ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | १७ जून, २०२५ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | २२ जून, २०२५ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २३ जून, २०२५ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २३ जून, २०२५ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | २३ जुलै, २०२५ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | irp.iskrupa@aegisipe.com |

दिनांक: ३० मे, २०२५
ठिकाण: मुंबई

सही/-
अविल मेनेझेस
एजिस रिझॉल्यूशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड चे प्राधिकृत स्वाक्षरीकार
ठराव व्यावसायिक
नोंदणी क्र: IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041
अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता दि. ३० जून २०२५ पर्यंत वैध

# दापोली नगरपंचायतीवर शिंदेंच्या शिवसेनेचा भगवा

■ मुंबई

**दापोली** नगरपंचायतीत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला आता मोठा धक्का बसला आहे. माजी नगराध्यक्षा ममता मोरे यांच्याविरोधात विशेष सभेत अविश्वास ठराव आणून त्यांना हटविल्यानंतर नगराध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली. यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या कृपा घाग यांची एकमताने निवड करण्यात आली. तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा दापोली नगरपंचायतीवर शिवसेनेचा भगवा फडकला आहे. या निवडीनंतर गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, कृपा घाग या समाजाभिमुख, कर्तबगार व सजग नेत्या म्हणून परिचित असून, दापोलीच्या सर्वांगीण विकासासाठी त्या कटिबद्ध राहतील, असा विश्वास नागरिकांमध्ये आहे. दापोलीत जनतेच्या मनात शिवसेनेबद्दल असलेला विश्वास पुन्हा अधोरेखित झाला आहे.

# शेळीपालनाआड ड्रगचा कारखाना! कर्जतच्या फार्महाऊसवर धाड

■ मुंबई



**कर्जतमध्ये** शेळीपालन व्यवसायाच्या नावाखाली एमडी ड्रगची निर्मिती करणारा कारखाना उद्ध्वस्त करत परिमंडळ सहाच्या पोलीस पथकाने २४ कोटी ४२ लाखांचा एमडी साठा, कच्चा माल हस्तगत केला. या प्रकरणी ६ आरोपींना अटक केली आहे. यानंतर कर्जत पोलीस फार्म हाऊस संघटनेच्या सदस्यांची बैठक घेऊन चर्चा करणार आहेत. त्याचप्रमाणे चौकशीही केली जाणार आहे.

चेंबूरमधील आरसीएफ पोलीस ठाण्यातील पथक गस्त करताना १९ मार्च रोजी एकाला ४५ ग्रॅम एमडीसह ताब्यात घेतले होते. त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. पथकाने अटक केलेल्या आरोपीसोबत अमली पदार्थ विक्री करणाऱ्या पाच जणांना मुंबई आणि नवी मुंबई येथून बेड्या ठोकल्या. आरोपींकडून १३ कोटी ३७ लाख किमतीचा ६ किलो ६८९ ग्रॅम वजनाचा एमडी १५ मे रोजी हस्तगत केला. आरोपींच्या चौकशीतून सावली फार्म हाऊस, कर्जत येथे शेळीपालन व्यवसाय करत असल्याचे भासवून एमडी तयार करत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी याठिकाणी धाड टाकली आणि एकाला अटक केली. या कारखान्यातून ११ कोटी ५ लाख किमतीचे एमडी ड्रग व एक कोटीचा कच्चा माल हस्तगत केला. पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळेंच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

# माजी आमदार सिद्धराम म्हेत्रेंचा शिंदे गटात प्रवेश रखडला

■ सोलापूर

**काँग्रेसचे** माजी आमदार आणि माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे निकटवर्ती सिद्धराम म्हेत्रे यांचा शिंदे गटात होणारा पक्षप्रवेश रखडला आहे. या अगोदर ३१ मे रोजी त्यांचा पक्षप्रवेश होणार होता, पण आता हा कार्यक्रम ५ जून रोजी होणार आहे.

या पक्षप्रवेशाबाबत माहिती शिवसेना शिंदे गटाचे लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे यांनी दिली आहे. सिद्धराम म्हेत्रे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्यांच्या प्रवेशामुळे मराठवाड्यात शिवसेनेची ताकद वाढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. पक्षप्रवेश रखडल्याने राजकीय चर्चांना उधाण आले होते.



२८ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या उपनगरी लॉबीच्या प्रांगणात ट्रेन मॅनेजर/मोटरमन यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४२ वी जयंती धुमधडाक्यात साजरी केली. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळ्याला माला अर्पण करून झाली. प्रमुख वक्ते विश्व हिंदू परिषदेचे कार्यकारिणी सदस्य आणि तलासरी वनवासी कल्याण केंद्र व्यवस्थापक माधवजी बर्वे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या खडतर आणि लोकोत्तर जीवनाची सविस्तर मांडणी श्रोत्यांपुढे केली. भारतमातेची आरती, राष्ट्रगीत आणि प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दरे गावाला जोडणारा तापोळा रस्ता खचला

■ महाबळेश्वर

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्या दरे तर्फ तांब या गावाला जोडला गेलेला महाबळेश्वर-तापोळा रस्ता मुसळधार पावसात खचला. या घडलेल्या घटनेमुळे रस्ते बांधकामावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे.

महाबळेश्वरहून तळदेव-तापोळा भागात हा रस्ता जातो. तसेच तो पुढे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरे तर्फ तांब या गावाला जोडला गेला आहे. अलीकडेच या रस्त्याचे काम पूर्ण झाले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून या परिसरात मोठ्या प्रमाणात रस्ते विकासाची कामे सुरू आहेत.

मात्र कामांची गुणवत्ता नसल्याने ठिकठिकाणी रस्ते खचण्याच्या व खड्डे पडण्याच्या घटना घडत आहेत. निकृष्ट दर्जाच्या कामांमध्ये वाढ झाली आहे. तरी या खचलेल्या रस्त्याच्या कामाची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

# महावितरणचा २०वा वर्धापन दिन विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन

■ मुंबई

**६ जून** रोजी येणाऱ्या २० व्या महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शून्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार हे ब्रिद घेऊन महावितरणच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयात विद्युत सुरक्षा सप्ताहात विविध कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. १ जून रोजी सर्व परिमंडळ कार्यालयाच्या मुख्यालयाच्या शहरात मॅरेथॉन रन फॉर सेफ्टी आयोजित करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थी, ग्राहक व जनमित्र यांचेसाठी विद्युत सुरक्षा प्रश्नमंजुषा जाहीर करण्यात आली आहे. महावितरण कार्यालय, रोहित्र पेटी, आर. एम. यु.,डिजिटल बोर्ड, शिडी गाडी, उपकेंद्र, तक्रार निवारण केंद्र, ग्राहक सुविधा केंद्र, रहिवासी परिसर इत्यादी ठिकाणी विद्युत सुरक्षा पोस्टर्स लावण्यात येणार असून, समाज माध्यमांद्वारे, रेडिओ, टीव्ही, प्रिंट मीडिया तसेच इतर माध्यमे वापरुन विद्युत सुरक्षाविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. २ जून रोजी राज्यातील ६५० उपविभागअंतर्गत शहर व ग्रामीण भागातील रहिवासी परिसरात विद्युत सुरक्षाविषयी जनजागृती करण्यात येईल. ३ व ४ जून रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आणि कुटुंबियांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षाविषयी निबंध व चित्रकला स्पर्धा, महावितरण कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी विद्युत सुरक्षेविषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ५ जूनला वसुंधरा दिनी १५० विभागीय स्तरावर विद्युत सुरक्षा व वीज बचत विषयी रॅली काढण्यात येणार आहे. तर ६ जूनला सकाळी १०.०० ते १०.१५ या वेळेत राज्यातील सर्व शाखा कार्यालयातील जनमित्र यांच्यासाठी विद्युत सुरक्षा प्रतिज्ञा कार्यक्रम होणार आहे.

# कॉमेडियनबाबत मुख्यमंत्र्यांच्या विधानावर कामराची खोचक पोस्ट

■ मुंबई

**स्टँड** अप कॉमेडियनना जास्त गांभीर्याने घेण्याची गरज नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे, अशा आशयाच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने एक्स पोस्टमधून उपहासात्मक प्रत्युत्तर दिले. तुमचे बरोबर आहे. कृपया माझ्या पुढील कार्यक्रमांकडे असेच दुर्लक्ष करा, अशी विनंती कामराने एक्स पोस्टवर केली.

पोस्टमध्ये कामरा म्हणतो की, फडणवीस तुम्ही योग्य विधान केले. माझ्यासारख्या कॉमेडियन्सना राजकीयदृष्ट्या दुर्लक्षित करणे उत्तम आहे. माझी काहीच लायकी नाही आणि माझे कार्यक्रम फक्त चार लोक पाहतात. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये मी ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद या शहरांमध्ये कार्यक्रमांचे नियोजन करत आहे. या कार्यक्रमांकडे कृपया लक्ष देऊ नका. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही तसे करायला सांगा.

# प्रणिती शिंदेंच्या नावे विमानाचे तिकीट बुक करत आंदोलन

■ सोलापूर

**सोलापूर** शहरात काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्याविरोधात भाजपाकडून एक अनोखे आणि उपहासात्मक आंदोलन करण्यात आले. भाजपाचे माजी नगरसेवक अनंत जाधव यांनी प्रणिती शिंदे यांच्या नावे सोलापूर ते गोवा या मार्गासाठी विमानाचे तिकीट स्वखर्चातून बुक केले आणि त्याच्या माध्यमातून काँग्रेसवर टीका केली. प्रणिती शिंदे यांनी यापूर्वी अनेकदा सोलापूरची विमानसेवा सुरू होणे शक्य नसल्याचे विधान केले होते. मात्र, अलीकडेच ही सेवा सुरू झाल्यानंतर भाजपाने हे यश आपले असल्याचा दावा केला आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपाने तिकीट बुक करत हे आंदोलन केले आणि खासदार प्रणिती शिंदे गोव्याला जा, अशा घोषणाही दिल्या. यापूर्वी काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांग सांग भोलानाथ, विमानसेवा सुरू होईल काय? असे आंदोलन करून भाजपा सरकारवर उपरोधिक प्रश्न उपस्थित केला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजपकडून हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी सांगितले की काँग्रेसला एवढेच सांगणे आहे की आम्ही जे बोलतो ते करुन दाखवतो.

# पाकिस्तानासाठी हेरगिरी ठाण्यातून एकाला अटक

■ ठाणे

**पाकिस्तानच्या** गुप्तचर संस्थेला माहिती पुरवल्याच्या संशयावरून ठाण्यातून रवी वर्मा या २७ वर्षीय तरुणाला एटीएसने अटक केली. तो कळव्यात राहणारा हा तरुण आईसोबत राहतो. तो एका खासगी कंपनीत ज्युनिअर इंजिनिअर म्हणून काम करत आहे. तो हनी ट्रॅपमध्ये अडकला असल्याचा संशय एटीएसला आहे. त्यानंतर त्याने नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ दरम्यान व्हॉट्सअॅपद्वारे एक महत्त्वाची संवेदनशील माहिती शेअर केली होती, या आरोपावरून त्याला अटक करण्यात आली.

# राज्यात आतापर्यंत कोरोनाचे ७ बळी

**मुंबई** - राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा एकदा वाढू लागला आहे. आतापर्यंत कोरोनामुळे राज्यात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. एकाच दिवसात ८६ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे कोरोना बाधित रुग्णांची एकूण संख्या ३८३ वर पोहोचली आहे. ८६ रुग्णांपैकी मुंबईत ३६, पुणे महापालिकेत ९, पिंपरी-चिंचवड महापालिकेत ३, ठाणे महापालिकेत २४, कल्याण महापालिकेत २, नवी मुंबईत ४, पनवेल महापालिकेत ४, नागपूर आणि अहिल्यानगरमध्ये प्रत्येकी २, तर रायगड जिल्ह्यात १ रुग्ण आढळला आहे.


**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 025 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in**.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0183 OS2 | 3000057731 | BIENNIAL WORK CONTRACT FOR HOUSEKEEPING AND ALLIED WORKS AT BOILER SIDE AT UNIT- 5, 500 MW, KHAPERKHEDATPS. | 190.45 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd/-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda



महावितरण

**ई–निविदा सूचना**

दि. २३.०५.२०२५ रोजी महावितरण तर्फे कणकवली विभागाअंतर्गत AB Switch Maintenance व Welding and Muffing of RSJ Pole या कामासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडून २५ लाखाच्या स्वतंत्र ०२ निविदा अनुक्रमे निविदा क्र. EE/KVL/DIV/TECH/T-01 OF 2025-26 व EE/KVL/DIV/TECH/T-02 OF 2025-26 मागविण्यात येत आहेत.

सविस्तर ई–निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. ई–निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. ०२.०६.२०२५ वेळ सकाळी १०:०० अशी आहे. सदर निविदांचे शुल्क व लागू असणारे बयाणा शुल्क ऑनलाईन पध्दतीने तसेच DD ने कार्यकारी अभियंता महावितरण कणकवली विभागा यांच्या नावे स्विकारले जातील. अधिक माहितीसाठी विभागीय कार्यालय, कणकवली फोन न. ७८७५७९५०१४ यांचेशी संपर्क साधावा.

PRO NO- PRO/KZR/14/2025-26 Dated 28.05.2025

**कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं. मर्या. कणकवली विभाग – कणकवली**



महावितरण

**ई–निविदा सूचना**

दि. २३.०५.२०२५ रोजी महावितरण तर्फे कणकवली विभागाअंतर्गत रोहित्र ब्रेकडाऊन दुरुस्तीच्या कामासाठी एक वर्षाच्या करारावर परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिका प्रविष्ठ (empanellment) करण्यासाठी स्वतंत्र निविदा EE/KVL/DIV/TECH/T-03 OF 2025-26 मागविण्यात येत आहे

सविस्तर ई–निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. ई–निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. ०२.०६.२०२५ वेळ सकाळी १०:०० अशी आहे. सदर निविदांचे शुल्क व लागू असणारे बयाणा शुल्क ऑनलाईन पध्दतीने तसेच DD ने कार्यकारी अभियंता महावितरण कणकवली विभागा यांच्या नावे स्विकारले जातील. अधिक माहितीसाठी विभागीय कार्यालय, कणकवली फोन न. ७८७५७९५०१४ यांचेशी संपर्क साधावा.

PRO NO- PRO/KZR/15/2025-26 Dated 28.05.2025

**कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं. मर्या. कणकवली विभाग – कणकवली**



महावितरण

**वीज बंदबाबत जाहीर निवेदन**

उल्हासनगर विभाग–१ अंतर्गत उपविभाग – ३ मधील वीज ग्राहकांना कळविण्यात येते की, दि. ३०/०५/२०२५ रोजी खालील वाहिनीचा वीज पुरवठा खाली दर्शविलेल्या वेळेत बंद राहील. तरी ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे.

| उपकेंद्र | फिडर | वेळ | प्रभावित क्षेत्र | कामाचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १००/२२ के.व्ही. टाटा नेतीवली | २२ केव्ही. के.आर. १ व के.आर. २ (इनकमर) | १०:०० ते १४:०० | शांतीनगर, पंचशिलनगर, उद्योगविहार, खन्ना कंपाउंड, रामगिरधारी, प्रविण हॉटेल, चोपडा कोर्ट एरिया, गोल मैदान, शमशानभुमी, वालधुनी, सपना गार्डन, उ.म.पा. कार्यालय, आंबेडकरनगर, गुरूद्वारा, सेक्शन १७,१८,१९,२१,२२, संतु बिल्डींग, सी.एच.एम.कॉलेज, कवाराम चौक, सुखदेव कंपाउँड, हंस तबेला (सेक्शन २०) इत्यादी. | १७ सेक्शन स्विचिंग स्टेशन यार्डमध्ये ऑईलिंग व ग्रिसिंगचे काम करणे, जी.ओ.डी. रिपेरिंग करणे, तिसगावनाका व विठ्ठलवाडी येथिल विज वाहीनीचे देखभाल व दुरूस्तीचे काम करणे. |
| २२केव्ही १७ सेक्शन स्विचिंग | २२ केव्ही. फिडर नं. ३०१ | १०:०० ते १५:०० | चोपडा कोर्ट एरिया, जय माता दी नगर, गोल मैदान. | झाडांच्या फांद्या छाटणे, रिजंम्परिंग करणे, विज वाहीनीचे देखभाल व दुरुस्तीचे काम करणे. |
| २२केव्ही १७ सेक्शन स्विचिंग | २२ केव्ही. फिडर नं. ३०३ | १०:०० ते १५:०० | गुरूद्वारा, सेक्शन १८,१९,२०, संतु बिल्डींग, सुखदेव कंम्पाउँड, सी.एच.एच. कॉलेज, कवाराम चौक, हंस तबेला (सेक्शन २०). | झाडांच्या फांद्या छाटणे, रिजंम्परिंग करणे, विज वाहीनीचे देखभाल व दुरुस्तीचे काम करणे. |
| २२केव्ही १७ सेक्शन स्विचिंग | २२ केव्ही. फिडर नं. ३०५ | १०:०० ते १५:०० | सपना गार्डन, उ.म.पा. कार्यालय, सेक्शन १७, अमन टॉकिज, मोबाईल बाजार, आर.के.टी.कॉलेज, शिव कॉलनी, हिरा मॅरेज हॉल, तिलसन मार्केट. | झाडांच्या फांद्या छाटणे, रिजंम्परिंग करणे, विज वाहीनीचे देखभाल व दुरुस्तीचे काम करणे. |
| २२केव्ही साईबाबा स्विचिंग स्टेशन | २२ केव्ही. इंडस्ट्रियल फिडर ३०९ | १०:०० ते १४:०० | अशोकनगर, ओटी सेक्शन, अयोध्यानगर, पिंटो पार्क, वडलगाव, पेहलुमल कंपाउँड, संतोषनगर, धरमदरबारजवळील एरिया. | आरडीएसएस योजनेअंतर्गत विद्युत वाहीनीची क्षमता वाढविणे. (0.1 to 0.2 sqmm) व झाडांच्या फांद्या छाटणे. |

सही/–
कार्यकारी अभियंता, उल्हासनगर विभाग–१


# चीनकडून पाकिस्तान सरकारला ३.७ अब्ज डॉलरचे कर्ज मिळणार

■ इस्लामाबाद

**चीनने** पाकिस्तानला ३.७ अब्ज डॉलरचे कर्ज देण्याची हमी दिली. हे व्यावसायिक कर्ज असून चिनी चलनामध्ये जून महिना संपण्यापूर्वी ते पाकिस्तानला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पाकिस्तानच्या परदेशी गंगाजळीचे प्रमाण अत्यल्प प्रमाणावर पोहोचले आहे. परदेशी गंगाजळी दोन आकडी कायम राहावी, या हेतूने चीनकडून हे कर्ज दिले जाणार आहे.

चीनने यापूर्वी देखील पाकिस्तानला कर्ज दिले होते. ते चिनी चलनातून दिले गेले नव्हते. मात्र यावेळी चिनी चलनातूनच हे कर्ज दिले जाणार आहे. अमेरिकेच्या डॉलरच्या स्वरुपात कर्ज न देण्याचा निर्णय चीनने घेतला आहे. मार्च ते जून २०२५ दरम्यान परिपक्व होणाऱ्या कर्जांचे फेरनियोजन करण्याच्या उद्देशाने अलिकडच्या काळात झालेल्या बैठकांमध्ये चीनने हे आश्वासन दिले. यावर्षी मार्च ते एप्रिल दरम्यान पाकिस्तानने इंडस्ट्रियल अँड कमर्शियल बँक ऑफ चायनाकडून ३ टप्प्यांत १.३ अब्ज डॉलरच्या कर्जाची यापूर्वीच परतफेड केली आहे. बँकेने पाकिस्तानकडून काही स्पष्टीकरण मागवली आहेत.

त्यानंतर नवीन कर्जाबाबतचा निर्णय होणार आहे. नाणेनिधीच्या १ अब्ज डॉलरची मदत मिळाल्यामुळे आता पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेकडील विदेशी गंगाजळी ११.४ अब्ज डॉलर इतकी झाली आहे. चीनच्या कर्जाचे फेरनियोजन केल्यानंतर ही रक्कम १२.७ अब्ज डॉलरपर्यंत वाढेल.

# दोन दिवसांच्या घसरणीनंतर शेअर बाजार वधारला

■ मुंबई

**मागील** सलग दोन दिवसांच्या घसरणीनंतर देशांतर्गत शेअर बाजाराने आज दमदार पुनरागमन केले. शेवटच्या अर्ध्या तासात झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजार वाढीसह बंद झाला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३२० अंकांच्या वाढीसह ८१,६३३ अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ८१ अंकांच्या वाढीसह २४,८३३ अंकांवर बंद झाला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकही दिवसाच्या उच्चांकी पातळीवर बंद झाले. त्यामुळे एकूणच बाजारात आज सकारात्मक वातावरण दिसले.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

परिवहन सेवा, स्थापत्य विभाग,
द्वितीय फेर निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील "आगार बांधकाम व इतर विकास कामे" अंतर्गत ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेकरिता आवश्यक बस स्टॉप पोल बसविणे (सन २०२३-२४) करिता ठामपा/पिआरओ/टीएमटी/१३९/२५-२६ दि.२४.०४.२०२५ अन्वये निविदा मागविण्यात आली होती. सदर कामास प्रतिसाद न मिळाल्याने ठा.म.पा./पि.आर.ओ./टीएमटी/२२२/२५-२६ दि.१४.०५.२०२५ अन्वये पुन:श्च फेर निविदा मागविण्यात आली होती. तरीदेखील सदर कामास प्रतिसाद न मिळाल्याने तृतीय ऑन-लाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारां विरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.३०.०५.२०२५ ते दि.०६.०६.२०२५ सायं. १६.०० वाजे पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.०६.०६.२०२५ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.०९.०६.२०२५ रोजी १६.०० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/३००/२०२५-२६
दि.२९.०५.२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता,
परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे
ठाणे महानगरपालिका, ठाणे

Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in



**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)**

म्हाडा MHADA

**निविदा सूचना क्र. ०२**

जा. क्र. का. अ./डी-१/दु.व.पु.मं./१५५८/२०२५
दिनांक : २८ मे २०२५

कार्यकारी अभियंता डी - १ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते व महानगर पालिका यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी- १ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | १% इसारा रक्कम रु. | २% सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा रु.) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १) | इ. क्र. ३८६-डी, व्ही. पी. रोड, मुंबई ची संरचनात्मक दुरुस्ती करणे. **(मंडळ निधी)** | ०९,९१,७४९/- | ०९,९१७/- | २०,०००/- | ५९०.०० | **०२.०६.२०२५ ते १६.०६.२०२५ दुपारी १२.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** | **१८.०६.२०२५ दुपारी १२.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** | १० महिने | ७ व त्यावरील |
| २) | इ. क्र. ११६, गोवर्धनदास खटाव बिल्डिंग, जे. एस. एस. रोड, गिरगांव, मुंबईची संरचनात्मक दुरुस्ती करणे. **(आमदार निधी)** | ०३,८२,१७३/- | ०३,८२२/- | ०८,०००/- | ५९०.०० | | | १० महिने | ८ व त्यावरील |
| ३) | इ. क्र. २१ बी. सी. खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई ची संरचनात्मक दुरुस्ती करणे. **(मंडळ निधी)** | ०९,४५,४९५.८९/- | ०९,५००/- | २०,०००/- | ५९०.०० | | | १० महिने | ७ व त्यावरील |

१) ठेकेदारांनी सॉल्वन्सी सर्टीफिकेट (Solvency) व परफॉर्मन्स सुरक्षा रक्कम व इतर सादर करावयाची कागदपत्रे यासाठी सविस्तर सुचना (Detail Tender Notice) चे अवलोकन करावे.
२) कोऱ्या निविदा इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते व महानगर पालिका यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणीप्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील...
३) म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/ निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नांव समाविष्ट नसल्याबाबतचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४) इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी **मुख्य लेखाधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ** यांच्या नांवावर द्यावी. कायम स्वरुपी इसारा रक्कम प्रमाणपत्र (P.E.M.D) ग्राहय धरण्यात येणार नाही. त्यामुळे ठेकेदारांना इसारा रक्कम भरावी लागेल.
५) कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता / डी- १ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, ८९-९५, रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई - ३४, यांचेकडून क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदाची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृत केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास रकाना क्र. ८ मधील शेवटच्या दिवशी कार्यकारी अभियंता / डी- १ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात सायंकाळी ४.०० वाजता उघडल्या जातील.
६) एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
७) अधिक माहितीकरीता सविस्तर निविदा पहावी.

CPRO/A/434

Follow us:@mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता ,
डी-१/मुं.इ.दु.व.पु.मंडळ.

# वीकेण्डला काय बघाल ?

## 'क्रिमिनल जस्टिस' सीझन ४

**माधव पुन्हा भेटीला आला आहे....**

**माधवच्या आयुष्यात कधी सरळ काही होतच नाही का ?**

कोर्टरूम ड्रामा असलेली पंकज त्रिपाठी यांची सीरिज 'क्रिमिनल जस्टिस' ला खूप लोकप्रियता मिळाली होती. या सीरिज मधील त्यांनी साकार केलेली माधव मिश्रा या वकीलाची भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली. या सीरिजचा दुसरा व तिसरा भाग सुध्दा यशस्वी झाला होता. काल २९ रोजी या सीरिजचा चौथा भाग जिओ हॉटस्टारवर




प्रदर्शित झाला आहे. ही सीरिज खरं म्हणजे मे महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यामध्ये प्रदर्शित करण्याचा निर्मात्यांचा बेत होता. परंतु मे महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात 'रॉयल्स', 'ग्रामचिकित्सालय', 'कुल' अशा काही सीरिज प्रदर्शित झाल्याकारणात त्या भाऊगर्दीमध्ये क्रिमिनल जस्टिसला जस्टिस मिळणार नाही, प्रेक्षकांचा न्याय मिळणार नाही असा विचार करुन चौथ्या सीझनचे प्रदर्शन पुढे ढकलण्यात आले होते.

या सीझनच्या ट्रेलरची सुरुवात सुरवीन चावलापासून होते. ती माधव मिश्राच्या घरी मदत मागण्यासाठी आली आहे. ती म्हणते, 'मला एका वकीलाची गरज आहे.' यावर माधव म्हणतो की, 'ही केस जितकी सहज दिसते, तितकी सहज अजिबात नाही. नाहीतर माझ्याकडे नसती का आली ही केस?' यामध्ये मोहम्मद जीशान अय्यूब देखील दिसतो आहे. माधव मिश्राला एका प्रेमसंबंध व एक धक्कादायक हत्येचा छडा लावायचा आहे. तो यात यशस्वी होईल का ?

**काय म्हणतात पंकज त्रिपाठी या सीझनविषयी**

वैविध्यपूर्ण भूमिका करुन अभिनेता पंकज त्रिपाठी यांनी स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. रुपेरी पडद्यापासून ओटीटी प्लॅटफॉर्मवर आपल्या सकस अभिनयाने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकून घेतली आहेत. या सीरिजविषयी बोलताना पंकज त्रिपाठी यांनी सांगितले की, 'क्रिमिनल जस्टिस' ही सीरिज माझ्यासाठी घरी परतण्यासारखेच आहे. माधव मिश्राच्या व्यक्तिरेखेमध्ये मी साकारतो तेव्हा असे वाटते की, मी माझ्या एखाद्या जुन्या मित्राला पुन्हा भेटत आहे, ज्याच्या कडून मला शिकण्यासारखे खूप काही आहे. या चौथ्या सीझनमध्ये एक नाही तर तीन नवे पैलू प्रेक्षकांना बघायला मिळतील.

**कोण कोण कलाकार आहेत?**

या सीझनमध्ये पंकज त्रिपाठीसह अनेक नामवंत कलाकार दिसणार आहेत. मोहम्मद झीशान अय्युब, सुरवीन चावला, मीता वशिष्ठ, आशा नेगी, श्वेता बसु प्रसाद, खुशबू अत्रे, आणि बरखा सिंग हे कलाकार आहेत. या सीरिजचे दिग्दर्शन रोहन सिप्पीने केले असून यापूर्वीचे सीझन देखील त्यानेच दिग्दर्शित केले होते. अप्लॉज एंटरटेनमेंट आणि बीबीसी स्टुडियोज इंडिया यांनी ही सीरिज निर्माण केली आहे.

## इंटेरोगेशन

हा थ्रिलर हिंदी भाषेतील चित्रपट आज झी ५ (Zee5) वर प्रदर्शित होत आहे.

**कथानक**

एका कृतीमुळे होणाऱ्या अनपेक्षित परिणामांची कथा आहे. एकटे राहणारे एक सेवानिवृत्त न्यायाधीश स्वत:च्या घरात मृत



पावतात. पोलीस अधिकारी त्यांच्या चार जवळच्या मित्रांची चौकशी करतो, जे त्याच दिवशी न्यायाधीशांना भेटायला आले होते. या चित्रपटात पाच व्यक्ती असून प्रत्येकाचे बदला घेण्याचे एक कारण आहे आणि ते एका योजनेच्या माध्यमातून काय करतात, बदला घेतात का हे दाखवले गेले आहे. या सिनेमात राजपाल यादव, यशपाल शर्मा, मानू सिंग आदि कलाकार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत अजोय वर्मा राजा.

## 'हिज स्टोरी ऑफ इतिहास'




मनप्रीत सिंग धामी दिग्दर्शित व लिखित या सिनेमामध्ये सुबोध भावेची प्रमुख भूमिका आहे. कथेची सुरुवात एका पित्याच्या चिंतेने होते व लवकरच तिचे रुपांतर व्यवस्थेच्या विरोधात होते. 'पंचकर्मा फिल्म्स' निर्मित 'हिज स्टोरी ऑफ इतिहास' मध्ये आकांक्षा पांडे, किशा अरोरा, अंकुल विकल आणि योगेंद्र टिक्कू हे कलाकार आहेत.

## कानखजूरा

'कानखजूरा' ही वेबसीरिज सोनी लिववर आज प्रदर्शित होत आहे. या क्राइम थ्रिलर सीरिजचे दिग्दर्शक चंदन अरोरा असून या सीरिजमध्ये रोशन मैथ्यू, मोहित रैना, त्रिनेत्र हलधर गुम्माराजू आणि सारा जेन डायस आदि कलाकार आहेत.




**कथानक**

गोव्याच्या पार्श्वभूमीवर हे कथानक असून 'कानखजूरा' ची कथा हत्येच्या आरोपासाठी शिक्षा झालेल्या जेलमधील एका आरोपीची आहे. त्याची लवकर सुटका होते. मात्र जेलमधील सुटकेसाठी त्याला एक अट घातली जाते की, त्याला पोलिसांचा हेर म्हणून काम करावे लागेल.

## अ कंप्लीट अननोन

हा चित्रपट १९६० च्या दशकातील महान गायक–गीतकार बॉब डायलनच्या जीवनावर आधारित असून यामध्ये १९ वर्षीय बॉब डायलनची कथा आहे. बॉब आपल्या गिटारसह न्यूयॉर्कमध्ये येतो आणि त्याच्या प्रतिभेने अमेरिकन संगीताचा मार्ग बदलतो. एलिजाह वाल्ड यांच्या पुस्तकावर आधारित या सिनेमाचे दिग्दर्शक जेम्स मॅंगोल्डने केले आहे व टिमोथी चालमेट, एडवर्ड नॉर्टन, मोनिका बारबरो आदिजण मुख्य भूमिकेत आहेत. हा सिनेमा जिओस्टारवर पहायला मिळेल.




## ए विडो'ज गेम

खऱ्या गुन्हेगारीच्या कथेवर आधारित, हा स्पॅनिश थ्रिलर चित्रपट मारिया जेसस मोरेनो कॅन्टोभोवती फिरतो, जी तिच्या प्रियकरासह तिच्या पतीच्या हत्येचे आयोजन करण्यासाठी एकत्र येते. ही मालिका फसवणूक, विश्वासघात, गुन्हेगारी आणि निष्ठा याचा शोध घेते. कार्लोस सेडेस द्वारा दिग्दर्शित या चित्रपटात इवाना बैक्वेरो, साल्वा रोड्रिगो, कारमेन माची आदि कलाकार आहेत. हा सिनेमा इंग्रजी सबटायटलसह तसेच हिंदी भाषेमध्ये डब करुन आज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे.




## थरकाप उडवणारी 'अंधार माया'

सध्या वेब विश्वामध्ये अधिकतर थ्रिलर, हॉरर सीरिज बनवल्या जात आहेत कारण प्रेक्षकांना देखील त्या पहायला आवडतात. आता मराठीमध्ये देखील प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी एक हॉरर




सीरिज आज झी ५ वर प्रदर्शित होत आहे ज्याचे नाव आहे 'अंधार माया'.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते भीमराव मुडे यांनी या सीरिजचे दिग्दर्शकत्व केले असून कपिल भोपटकर यांनी पटकथा लिहिली आहे. या सीरिजमध्ये अभिनेते किशोर कदम एका गूढ भूमिकेत दिसणार आहेत. कोकणाच्या पार्श्वभूमीवर एका कुटुंबाच्या भूतकाळाने ग्रासलेल्या पूर्वजांच्या घरात घडणाऱ्या या सीरिजमध्ये ऋतुजा बागवे, शुभंकर तावडे हे कलाकार आहेत.

## सिस्टर मिडनाईट

हा सिनेमा गेल्या आठवड्यात प्रदर्शित होणार होता, मात्र त्याचे प्रदर्शन लांबणीवर पडले होते. कथा ८० च्या दशकातील दिल्लीच्या पार्श्वभूमीवर उमाचा ज्याच्याशी विवाह झाला असतो तो सरळ साधा असतो. हळूहळू वास्तव आणि उमाचे काल्पनिक जग एकमेकांवर आदळू लागतात. कधी ती बकऱ्यांशी बोलते तर कधी रक्त पिपासू बनण्याच्या विचारात तल्लीन होते. डार्क कॉमेडी आणि सोशल सटायर. दिग्दर्शक अरुणा राघवन यांनी केले आहे. हा कान्स चित्रपट महोत्सवात दाखवण्यात आला होता आणि बाफ्टा पुरस्कारासाठी नामांकित झाला होता. राधिका आपटे, अशोक पाठक, छाया कदम, स्मिता तांबे आदि कलाकार असलेला हा सिनेमा प्रेक्षकांना हसवता हसवता विचार करायला लावेल.







## कन्नप्पा संकटात

विष्णु मांचू, अक्षय कुमार, प्रभास, मोहनलाल, काजल अग्रवाल अभिनित बहुचर्चित 'कन्नप्पा' हा चित्रपट पुढील महिन्याच्या २७ तारखेला प्रदर्शित होणार आहे, परंतु आता या सिनेमाची हार्डडिस्क चोरी झाल्याची बातमी समोर आली आहे. निर्मात्यांनी काही अज्ञात लोकांवर हार्डडिस्क चोरी केल्याचा आरोप लावला आहे. या डिस्कमध्ये चित्रपटाचे काही महत्त्वाचे व्हीएफएक्स सीन्स आहेत. हैदराबादच्या फिल्मनगर पोलीस स्टेशनमध्ये निर्मात्याने याविषयी तक्रार नोंदवली आहे. 'कन्नप्पा' हा एक पौराणिक चित्रपट असून भगवान शंकराच्या कन्नप्पा या महान भक्तावर आधारित आहे.



## जेनिफर आणि करण पुन्हा एकत्र ?

एके काळी अभिनेत्री जेनिफर विंगेट आणि करणसिंग ग्रोव्हर छोट्या पडद्यावरील लोकप्रिय जोडपे मानले जात असे. आता हे दोघेजण एकत्र दिसणार असल्याचे बोलले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार दोघेही निर्माता–दिग्दर्शक करण जोहर 'द ट्रेटर्स' या नव्या शोमध्ये सहभागी होणार आहेत. अनेक वर्षाच्या डेटिंगनंतर जेनिफर आणि करणने २०१२ साली विवाह केला होता आणि २ वर्षानंतर २०१४ मध्ये घटस्फोट घेतला होता. त्यानंतर करणने अभिनेत्री बिपाशा बासूसह विवाह केला तर जेनिफर आजही एकटे जीवन जगत आहे. आता अकरा वर्षानंतर दोघांना एकत्र बघणे या दोघांच्या चाहत्यांना नक्कीच आवडेल. करण जौहरचा शो वादविवाद आणि भांडणांसाठी ओळखला जातो. 'द ट्रेटर्स'हा कार्यक्रम येत्या १२ जूनपासून प्राइम व्हिडिओवर सुरु होणार आहे.



## होम्बलसह ऋतिक

'होम्बल फिल्म्स'ने भारतीय मनोरंजनामध्ये बलाढ्य स्थान निर्माण केले आहे. या चित्रपट निर्माण संस्थेने 'के.जी.एफ: चॅप्टर १', 'जी.एफ: चॅप्टर २', 'सलार पार्ट २', 'कंतारा' असे एकापेक्षा एक यशस्वी चित्रपट दिले आहेत. आता या चित्रपटाने ऋतिकसह चित्रपट बनवण्याचा निर्णय घेतला आहे. 'होम्बल फिल्म्स'ने ऋतिकसह बनवत असलेल्या या चित्रपटाची कथा 'धैर्य, भव्यता आणि गौरवाने भरलेली असेल असा दावा केला आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर ऋतिकविषयी एक नोट पोस्ट करत लिहिले आहे की,' लोक त्याला ग्रीक गॉड म्हणतात. त्याने लोकांच्या मनावर राज्य केले आहे. सीमा तोडून भारताबाहेर देखील त्याने लोकप्रियता मिळवली आहे. आणि आम्ही बघितले आहे की वास्तवात तो कसा आहे. खूप मेहनत घेऊन ज्या ऋतिकने आपली कारकीर्द बनवली आहे, त्याचे सहकार्य आम्हाला आता लाभत त्याबद्दल आम्हाला खूप अभिमान वाटत आहे. आम्ही त्याचे स्वागत करतो. एक धमाकेदार सुरुवात होणार आहे. ऋतिक रोशन देखील 'होम्बल फिल्म्स' सोबतच्या या आगामी प्रोजेक्टबद्दल उत्सुक आहे. त्याने सांगितले की, होम्बलने गेल्या काही वर्षांत चित्रपटांद्वारे खूप चांगल्या कथा आणल्या आहेत. मी त्यांच्यासह सहभागी होण्यास आणि प्रेक्षकांना एक चांगला सिनेमा देण्यासाठी उत्सुक आहे.



## तमन्नाने केली चूक

**अभिनेत्री** तमन्ना भाटियाने नुकतेच सोशल मीडियावर एक रील लाईक केले, जे आता दीपिका पदुकोणच्या मुद्याशी जोडले जात आहे. झाले असे आहे की, सध्या दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' चित्रपटाबाबत दीपिका पदुकोण व त्यांच्यामध्ये वाद सुरु आहे. त्यातच तमन्ना भाटियाने एक रील लाईक करून या वादामध्ये उडी घेतली आहे. तिने जे रील लाईक केले आहे, त्यात महिलांच्या विरोधात पसरवले व अन्यायाविषयी वक्तव्य केले गेले आहे. तिने केलेले हे लाईक बघून आता तमन्नाचे चाहते म्हणत आहेत की, दीपिकाला सपोर्ट दर्शवण्याची ही तमन्नाची स्वत:ची पद्धत आहे. परंतु तमन्नाने याचा दोष सोशल मीडियाला दिला आहे. तिने एक आपला व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर केला आहे, त्या व्हिडिओमध्ये ती बोलली काही नाही, शब्दांऐवजी तिने वेगवेगळे हावभाव केले आहेत आणि सोबत लिहिले आहे की, 'इंस्टाग्राम हे सांगू शकतो का की, कसे तो स्वत:च कुठलेही पेज किंवा रील माझ्या वतीने लाईक करू शकतो ? कारण आता लोक त्याचा मुद्दा बनवत आहेत आणि माझ्याकडे खरोखरच खूप काम आहे.

तमन्नाच्या या रीलवर आता लोकांनी कमेंट्स लिहिणे सुरु केले आहे.



## रवीना–करिष्माचे भांडण

**असे** म्हटले जाते आणि ते ९५ टक्के खरे आहे की, दोन सहकालिन अभिनेत्रींचे कधीच एकमेकांशी पटत नसते. समोरासमोर आल्या तर त्या एकमेकांशी धड बोलत देखील नाही. ही गोष्ट भारतीय सिनेसृष्टीमध्ये पूर्वापार चालत आली आहे. ९०च्या दशकात एकमेकींशी भांडणाऱ्या, एकमेकींचा दुस्वास करणाऱ्या दोन अभिनेत्रींमध्ये सर्वात वरच्या क्रमांकावर नाव येते ते करिश्मा कपूर आणि रवीना टंडन. या दोघींनी 'अंदाज अपना–अपना' आणि 'आतिश' या दोन सिनेमांमध्ये एकत्र काम केले होते. 'अंदाज अपना अपना' बनत असताना या चित्रपटात काम करणाऱ्या सलमान व आमिर खान यांची एकमेकांसह चांगली मैत्री होती, परंतु रवीना आणि करिश्मा मधून विस्तव जात नसे. आता इतक्या वर्षानंतर पहिल्यांदा रवीना टंडनने एका मुलाखतीमध्ये या गोष्टीचा उल्लेख केला आहे. तिने सांगितले की, आमच्या भांडणांमुळे शूटिंग करताना अनेकदा समस्या निर्माण होत असत. आम्ही दोघीही त्यावेळी लहान होतो, २०–२१ वर्षांच्या. आणि शाळेतील वर्गात लहान सहान राजकारण सुरु असते, तेच आम्ही देखील अनुभवले.




## अरिजित रचणार इतिहास

**लोकप्रिय** गायक अरिजित सिंग लवकरच एक इतिहास निर्माण करणार आहे. तो यूके येथील टोटेनहम हॉटस्पर स्टेडियममध्ये संगीतमय कार्यक्रम सादर करणारा पहिला भारतीय असणार आहे. येत्या ५ सप्टेंबरला त्याचा कार्यक्रम सादर होणार आहे. याविषयी बोलताना अरिजितने सांगितले की, मी एक गाणे गाणारा सर्वसाधारण माणूस आहे, मला अभिमान आणि आनंद वाटत आहे की, लंडनला मला गाणी गाण्याची संधी मिळाली आहे. या कार्यक्रमामुळे माझ्याकडून एक इतिहास रचला जात असेल तर माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. लंडन येथे होणाऱ्या या कार्यक्रमाची तिकिट विक्री ६ जूनच्या दुपारपासून सुरु होणार आहे.

•••

# नवाकाळ शब्दकोडे-१२६७



**आडवे शब्द –**

२. समर्थन ६. गुणांची कदर करणारा १०. बर्फ १२. कडक उन्हामुळे होणारी अंगाची आग १४. पूर्वी रेल्वे या इंधनावर चालत १६. ढीग १७. पतीचा भाऊ १९. शेतीवरचा जुना कर २०. पद्य, गीत २२. नाक, नासिका २४. मार्जन, धुवून स्वच्छ करणे २६. सुवास २७. जेव्हा २९. अंतःकरण ३१. निर्धन ३३. वजनदार ३४. तीर, काठ ३५. कोणाचा अंकुश नसलेली सत्ता ३६. साष्टांग नमस्कार ३७. इच्छा ३९. न आवडलेले ४०. प्रतिक्रिया, न्याय ४१. पांढरा ४३. कागद डकवण्याचे साधन ४४. बालवाडीत जाणारे मूल ४५. परिणामांची पर्वा नसलेला, बेपर्वा ४७. लता, वल्लरी, वेल ४८. उणे ४९. गाढव, मूर्ख ५१. पौराणिक काळातील शाही घोडागाडी ५३. दुर्दशा ५४. तानाजी मालुसरे यांची उपाधी ५५. कबूल ५६. आवड, रुची ५८. मूलबाळ नसलेले ६०. बगळा, बलाक पक्षी ६१. कारल्याची चव ६३. वनिता, स्त्री ६४. फुलांची माळ ६६. युद्धनौकांचा ताफा, नौदल ६७. पतीचे घर ६९. परंपरावादी विचारांचा ७२. अल्प, थोडे ७३. खोडकर ७५. भूतबाधा, झपाटणे ७६. गरजू, अडलेला ७८. रक्तवाहिनी ८०. कट रचताना गुन्हेगारांचे मतैक्य ८२. नूतन ८५. उथळ, बटबटीत ८६. रमलेला ८७. कायदा व सुव्यवस्था मोडून पडलेला प्रदेश ९०. वायू, वात ९१. गणेशोत्सवाचा महिना ९३. त्वचेवर लावण्याचे औषध ९५. त्रासलेला, त्रस्त ९६. मनापासून आवडलेले ९७. सर्प ९८. कडधान्याची पातळ भाजी ९९. कांचन, सुवर्ण १००. सुरा १०१. प्रामाणिक १०२. कमीत कमी १०४. ब्लाऊजच्या कापडाचा प्रकार १०६. हेलिकॉप्टर १०७. रथ हाकणारा १०८. यजमान, कुटुंबप्रमुख

**उभे शब्द –**

१. कंत्राट २. भारतातील एक प्राचीन भाषा ३. ओढूनताणून आणलेला संबंध ४. अर्जुनाचे धनुष्य ५. वेळू, बांबू ७. चर, खड्डा ८. जिव्हा, जीभ ९. सरिता ११. अनंग, कामदेव १३. उत्साहावर पाणी पडणे, विरस १५. हळू, संथ गतीने १८. राख, भस्म २१. नलिका २३. श्रीकृष्ण २५. युद्ध २६. जन्मभर २८. उत्साहाने सुरू केलेले काम अर्धवट सोडून देणारा ३०. लिव्हरचा गंभीर आजार ३२. दया, करुणा ३४. वडील, जनक ३८. नुकसानकारक ३९. आवाज, छंद ४०. पती, नवरा ४२. स्त्री, विलासी स्त्री ४३. कुरवाळणे ४६. इच्छा, मनीषा ४८. अरण्य, कानन ४९. फळातला मगज ५०. गाढ निजलेला ५२. भारत-पाक सीमेवरचे वाळवंट ५३. दानव, राक्षस ५७. युद्धप्रसंगी स्फुरण देणारे गीत ५८. चंगळ, चैन, मुलांचे एक नाव ५९. एका राजकीय पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे ६०. चलती, उत्कर्ष ६१. मिळकत, उत्पन्न ६२. कंठ ६५. स्त्रियांचा कंबरेचा अलंकार ६६. कामाचा कंटाळा असलेला ६८. सुखरूप ७०. विड्याच्या पानांची वेल ७१. निद्रा ७४. तल्लीन ७७. खानदान, घराणे ७९. कुमक, मदत ८०. पांढरा शुभ्र व उंची दर्जाचा दगड ८१. मृदू ८२. गाव ८३. लग्नातली मिरवणूक ८४. देवांचा राजा ८७. गुंतागुंत, संसारातील अडचणी ८८. तांबडे पंख असलेला लठ्ठ पोपट ८९. सीतेचे वडील ९०. वसंत ऋतूतील ९१. टीका, मल्लीनाथी ९२. वस्त्राचा विरलेला तुकडा, चिंधी ९४. खांबावर आडवी टाकलेली तुळई ९५. चण्याच्या डाळीचे पीठ ९७. निःश्वास ९८. आवेग, भावनेचा उद्रेक १००. धनुष्य, नथीचा चिमटा १०३. बाण १०४. दहावे नक्षत्र १०५. नायट्रोजन वायू

**नवाकाळ कोडे क्रमांक १२६६चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. विजनवास ५. अकस्मात ७. गजकर्ण १०. उदी १२. वटी १३. हजर १५. डगमगणे १७. मदार १८. पळ २०. डबीर २१. फरक २२. रहिवासी २४. सारंग २५. अंदाज २७. वाली २९. लगोलग ३०. नमुनेदार ३१. पावसाळा ३३. संप ३४. अभद्र ३५. हमखास ३६. नाविक ३७. कस ३९. पाट ४०. कंदील ४२. वन ४४. रीम ४५. रोकड ४६. लक्ष्य ४७. महानता ५०. ढिसाळ ५१. अंमल ५४. मस्कारा ५६. बिंग ५७. घडणावळ ५९. आंबा ६०. गैरवापर ६३. नाठाळ ६५. वर ६७. पुत्र ६८. सळसळ ७०. दयार्णव ७२. पुरा ७४. द्रव ७६. क्षमस्व ७८. रव ७९. कच्छप ८०. त्वष्टा ८१. सल्लामसलत ८४. येथे ८६. साळ ८७. लाल ८८. लाजरा ९०. ऊठबस ९३. तलखी ९६. श्रम ९७. मधुर ९९. डेरा १००. सीमा १०२. वाळूक १०४. भूक १०५. भेजा १०७. हटवादी १०८. वसंत १०९. विराट ११०. वळणदार

**उभे शब्द :** २. जवळ ३. नटी ४. सह ५. अरबी समुद्र ६. तडफदार ७. गमक ८. जग ९. कणेर १०. उदासी ११. दीर १४. जड १६. गरज १७. मवाली १८. पहिलटकरीण १९. तरंग २३. हिवाळा २४. सालस २५. अंदाधुंदी २६. नवखा २८. सपक ३०. नभ ३१. पाम तेल ३२. सासव ३३. संविधान ३४. अटकळ ३८. सम ३९. पारोसापिंपळ ४०. कंडम ४१. लस्सी ४३. नमस्कार ४८. हारा ४९. ताडोबा ५१. अंगना ५२. लघळ ५३. तणाव ५५. धार ५८. वरद ५९. आंत्रपुच्छ ६०. गैर ६१. वासव ६२. रसगुल्ला ६४. ठाम ६६. अर्णव ६९. धाम ७१. यार ७३. रापण ७४. द्रष्टा ७५. वास ७६. क्षतज ७७. स्वये ७९. कळ ८०. त्वरित ८१. सल ८२. मही ८३. ललामभूत ८५. थेऊर ८६. सासरा ८७. लाखी ८९. राम ९१. बडेजाव ९२. दासी ९४. लपेट ९५. वाळू ९८. धुमारा १०१. मास्तर १०३. कव १०६. प्राण

# वैष्णवीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका! वडिलांना अश्रू अनावर

पान १ वरून

दबावाखाली हे लग्न ठरवले. त्यांनी अधिक महिन्यात जावयाला चांदीचे ताट, गौरी पाहिजे असाही हट्ट धरला होता. तोपण मी पूर्ण केला.

अनिल कस्पटे पुढे म्हणाले की, वैष्णवीचे अंत्यसंस्कार झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी माझ्या मोठ्या भावाने तिचे बाळ आमच्याकडे द्या या मागणीसाठी आरोपी नणंद करिश्मा हगवणेला फोन केला होता. परंतु तिने आम्हाला बाळ आणून दिले नाही. त्यानंतर आरोपी राजेंद्र हगवणेचे मोठे भाऊ जयप्रकाश हगवणे यांनी आम्हाला फोन करून सांगितले की, बाळाची हेळसांड होत आहे, तुम्ही बाळाला घेऊन जा. त्यानंतर माझा भाऊ हे बाळाला आणायला हगवणेंकडे गेला, तेव्हा ते बाळ निलेश चव्हाण यांच्याकडे आहे असे सांगितले. माझ्या भावाने बाळाची मागणी केली असता निलेश चव्हाणने त्यांना बंदुकीचा धाक दाखवला. आपली सून मयत झाली असताना हगवणे यांनी बाळाला निलेश चव्हाणकडे कसे दिले? बाळ वैष्णवीकडे होते. मग ते बाळ निलेश चव्हाणकडे कसे पोहोचले? याचा अर्थ निलेश चव्हाणदेखील या कटात सहभागी आहे. त्यामुळे त्यालाही सहआरोपी करा. आमचा पोलीस अधिकारी जालिंदर सुपेकरांशी काहीही संबंध नाही असे ते सांगतात. मात्र आम्ही मामाच्या जीवावर काहीही करू शकतो, अशी धमकी हगवणेंकडून आम्हाला सतत दिली जात होती.

वैष्णवीच्या आत्महत्येपूर्वी सलग सात-आठ दिवस वैष्णवीला वेगवेगळ्या शस्त्रांनी मारहाण झाल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. याबाबत अनिल कस्पटे म्हणाले की, वैष्णवीने आत्महत्या करण्याआधी सात ते आठ दिवस सातत्याने हगवणे कुटुंब तिला मारहाण करत होते. १० तारखेला वैष्णवी घरी आली होती. तेव्हा ती आईला याविषयी बोलली होती. मारहाण होत आहे, छळ करत आहेत, असे ती म्हणाली. पण पती शशांकचा फोन आल्यावर तिला दुसऱ्याच दिवशी परत जावे लागले होते. परंतु हे कुटुंब आता वैष्णवीवर काहीही आरोप करत आहेत.

## सुपेकरांचा उपमहानिरीक्षक पदाचा कार्यभार काढला

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात आयपीएस अधिकारी जालिंदर सुपेकर यांचे नाव वारंवार चर्चेत येत होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीदेखील याप्रकरणी त्यांच्या विरोधात कारवाईची जोरदार मागणी केली होती. सुपेकर हे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक (मुख्यालय - कारागृह विभाग) या पदावर कार्यरत होते. त्यांच्याकडे नाशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर (पूर्व व पश्चिम), नागपूर आणि मध्य विभागाचा अतिरिक्त कार्यभार होता. मात्र आता त्यांची बदली पुणे विभागात करण्यात आली आहे आणि त्यांच्याकडील सर्व अतिरिक्त जबाबदाऱ्या काढून घेण्यात आल्या आहेत. गृह विभागाच्या या निर्णयामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे.

# पुरुषांसाठीही आयोग स्थापन करा मनविसेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

पुणे

**राज्यात** पुरुष आयोग स्थापन करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे (मनविसे) पुणे जिल्हाध्यक्ष आशिष साबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सध्या पुण्यात वैष्णवी हगवणे हे अत्यंत नाजूक व संवेदनशील प्रकरण गाजत आहे. त्या संपूर्ण क्रूरकर्मा कुटुंबाला कठोर शिक्षा देवून वैष्णवीला न्याय मिळवून द्यावा. परंतु राज्यात अशाही घटना घडत आहेत की, ज्यामध्ये पुरुषांचा मानसिक छळ होतो. त्यांच्यावर खोटे खटले दाखल केले जातात. घटस्फोट घेताना लाखोंची, करोडोंची, पोटगी मागितली जाते. अशा वेळी पुरुषांना दाद मागण्यासाठी व्यासपीठ असावे म्हणून पुरुष स्थापन करण्याची आमची मागणी आहे. भारतात पुरुष हिंसाचार व मानसिक छळाचे एकूण प्रमाण हे ५१.५ टक्के आहे. पुरुषांना पोलीस, न्यायालय या कोणत्याही ठिकाणी थारा मिळत नाही. कारण जवळपास सर्व कायदे हे महिलांच्या बाजूने आहेत. या बाबींचा सकारात्मकदृष्ट्या विचार करावा, असे त्यांनी पत्रात म्हटले.

**मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड.**

**निविदा करिता विनंती**
**MRVC-W-PNVL-KJT-TunnelOHE**

**(दोन पाकिट ई– प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)**

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई– ४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात MUTP-III अंतर्गत पनवेल–कर्जत दुहेरी मार्ग उपनगरीय कॉरिडॉरच्या बोगद्यांच्या आत (३) ओएचई फिक्सिंग व्यवस्था"** ई–निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई–प्रोक्योरमेंट वेबसाइट **https://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत। पूर्ण भरलेली ई–निविदा वेबसाईट **https://www.ireps.gov.in** वर जमा करण्याची शेवटची तारीख **२३.०६.२०२५ रोजी दु. १५:०० वा.** पर्यंत आहे. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल।**

SBI

BOBCAPS
TRUST I INNOVATION I EXCELLENCE
(Wholly owned subsidiary of Bank of Baroda)

**स्विस चॅलेंज पद्धतीअंतर्गत ई-लिलावाद्वारे गॅनन डंकरले अँड कंपनी लिमिटेड ('जीडीसीएल') च्या स्ट्रेस्ड लोन एक्सपोजरच्या हस्तांतरणासंदर्भात जाहिरात**

**भारतीय स्टेट बँक ("एसबीआय")** आणि इतर संघटना धनको युनियन बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक आणि युको बँक (एकत्रितरित्या, **"धनको"**) यांच्या करिता आणि वतीने बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड (**"बीओबीकॅप्स"**) (**"प्रक्रिया सल्लागार"** म्हणून नियुक्ती) पात्र एआरसी/संस्थांकडून (**"पात्र सहभागी"**) स्विस चॅलेंज पद्धतीअंतर्गत **"सर्व रोखी"** तत्त्वावर ई-लिलावाद्वारे दि. ३१ मार्च, २०२५ रोजीनुसारची निधी-आधारित थकबाकी **रु. ८३६.९४ कोटी (रुपये आठशे छत्तीस कोटी चौऱ्याण्णव लाख मात्र)** आणि विना-निधी आधारित थकबाकी **रु. ५५५.०८ कोटी (रुपये पाचशे पंचावन्न कोटी आठ लाख मात्र)** एकूण **रु. १,३९२.०२ कोटी (रुपये एक हजार तीनशे ब्याण्णव कोटी आणि दोन लाख मात्र)** सह **गॅनन डंकरले अँड कंपनी लिमिटेड ("जीडीसीएल")** खात्या(त्यां)मधील धनकोंच्या स्ट्रेस्ड लोन एक्सपोजर्सच्या हस्तांतरणाकरिता स्ट्रेस्ड लोन एक्सपोजर्सच्या हस्तांतरणाकरिता भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विद्यमान मुख्य दिशानिर्देशांनुसार (आरबीआय दिशानिर्देश) स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रित करीत आहे. जीडीसीएलच्या स्ट्रेस्ड लोन एक्सपोजर्सचे हस्तांतरण **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "जसे आहे तसे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** धनकोद्वारे कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय हातात असलेल्या विद्यमान प्रस्तावावर आधारित (**"अँकर बोली"**) असेल. ई-लिलाव अँकर बोलीवर आधारित **"स्विस चॅलेंज पद्धती"** अंतर्गत असल्याचे विचारात घेता, बोली प्रक्रिया दस्तऐवज (**"बीपीडी"**) आणि आरबीआय दिशानिर्देशांमध्ये नमूद केलेल्या पद्धतीमध्ये उच्चतम बोलीस जुळविण्याचा अधिकार अँकर बोलीदारास असेल. जीडीसीएल करिता किंवा त्याच्याशी संबंधीत कोणतेही कार्यरत, कायदेशीर किंवा कोणतेही इतर प्रतिनिधित्व किंवा वॉरंट्स धनकोस अपेक्षित नाहीत किंवा अन्यथा. सर्व इच्छुक पात्र सहभागींना विनंती आहे की त्यांनी ई-लिलावामध्ये सहभागी होण्याची त्यांची इच्छा **स्वारस्य अभिव्यक्ती "ईओआय"** द्वारे **आणि ना-प्रकटीकरण करार करून** सादर करावी. ईओआय सादरीकरणाचा अंतिम दिनांक ५ जून, २०२५ आहे. इच्छुक बोलीदार बीपीडी आणि अधिक तपशिलाकरिता बँकेची वेबसाईट (https://bank.sbi/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others) आणि/किंवा बीओबीकॅप्स (https://www.bobcaps.in/tenders/) पाहू शकतात.

कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया खालील ठिकाणी संपर्क करा:

| संपर्क व्यक्ती | संपर्क तपशील | ईमेल-आयडी |
|---|---|---|
| श्री. नितीन चतुर्वेदी (एजीएम-एसबीआय) | +९१- ७९०६०१४८०२ | agm4infra2.sarg@sbi.co.in |
| श्री. विनय तिबरेवाल (बीओबीकॅप्स) | +९१- ९८२०१४६१८६ | projectepc@bobcaps.in |
| श्रीमती मैत्री सेठ (बीओबीकॅप्स) | +९१- ९८६७९३९३०३ | |

कृपया नोंद घ्यावी की, सदर जाहिरातीमध्ये विचारात घेतलेली ई-लिलाव प्रक्रिया ही धनकोच्या सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे अंतिम मंजुरीच्या अधीन आहे. तसेच, धनको सदर जाहिरात किंवा त्यामधील कोणत्याही शर्ती आणि बीपीडी कोणत्याही टप्प्यावर, वरील उल्लेखित वेबसाईट्सवर शुद्धीपत्रक प्रसिद्ध करून, कोणतेही कारण न दर्शविता आणि तसेच कोणतेही दायित्व, बंधने किंवा कोणत्याही प्रकारच्या जबाबदाऱ्या न घेता रद्द, दुरुस्ती, सुधारणा करू शकतात किंवा मागे घेऊ शकतात. असे स्पष्ट करण्यात येते की, सह जाहिरात ही प्रस्ताव दस्तऐवज नाही आणि त्यामध्ये समाविष्ट असणारे काहीही बंधनकारक प्रस्ताव किंवा कोणतेही ऋण/मालमत्ता विक्री/अभिहस्तांकनाची वचनबद्धता निर्माण करीत नाही. अर्जदाराने स्पष्टीकरण/सुधारणा/वेळ-विस्तार, जर असल्यास यांसह वरील विक्री/अभिहस्तांकनाकरिता पालन करावयाच्या प्रक्रियेसंबंधी स्वतःला अद्ययावत ठेवण्याकरिता वरील वेबसाईटला नियमित भेट द्यावी. या संदर्भातील धनकोचा निर्णय अंतिम, निर्णायक आणि सर्व इच्छुक पक्षकारांवर बंधनकारक असेल.

**दिनांकः ३० मे, २०२५** **ठिकाणः मुंबई**

# फिनले मिल कर्मचाऱ्यांचे ६० तासांनंतर आंदोलन मागे

अमरावती

**अचलपूर** येथील फिनले मिलमधील थकीत वेतनाच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन तब्बल ६० तासांनंतर अखेर मागे घेण्यात आले. सुमारे अडीचशे फूट उंच चिमणीवर चढून विकेश उघडे आणि मनोज सूर्यवंशी हे दोन कामगार भरपावसात शोले स्टाईल आंदोलन करत होते. तर या चिमणीखालीही इतर कामगार ठिय्या देऊन आंदोलन करत होते. फिनले मिलमधील कर्मचाऱ्यांचे अनेक महिन्यांचे वेतन थकले आहे. यासाठी यापूर्वीही कामगारांनी चिमणीवर चढून आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल अखेर प्रशासनाने घेतली. आमदार प्रवीण तायडे यांच्या मध्यस्थीने प्रशासन आणि कामगारांमध्ये चर्चा झाली. पुढील दोन महिन्यांत सर्व मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन फिनले मिल प्रशासनाने दिले. यानंतर दोन्ही कामगार चिमणीवरून खाली उतरले. मात्र चिमणीवर तब्बल तीन दिवस बसून आंदोलन केलेल्या या कामगारांची प्रकृती बिघडली असल्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.



# आम्ही ईशान्य भारताला विकासाच्या केंद्रस्थानी आणले

पान १ वरून

सिक्कीमच्या प्रत्येक कुटुंबाचा देशावरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आज सिक्कीम प्रगतीचे मॉडेल बनले असून, देशाचा अभिमान आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहूनही विकास साधण्याचा आदर्श इथे दिसतो. सिक्कीम हे देशातील पहिले शंभर टक्के सेंद्रिय राज्य बनले आहे. सिक्कीम देशातील अशा राज्यांपैकी एक आहे, जिथे दरडोई उत्पन्न सर्वाधिक आहे. हे यश केवळ जनतेच्या सामर्थ्यामुळे शक्य झाले. गेल्या ५० वर्षांत सिक्कीममधून अशा अनेक ताऱ्यांचा उदय झाला आहे, ज्यांनी भारताला गौरव मिळवून दिला आहे. प्रत्येक राज्याची स्वतःची एक खासियत आहे आणि तिचा योग्य उपयोग करणे गरजेचे आहे. गेल्या दशकात आमच्या सरकारने ईशान्य भारताला विकासाच्या केंद्रस्थानी आणले आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीत ईशान्य भारत गुंतवणूक शिखर परिषद पार पडली. या परिषदेत देशातील प्रमुख उद्योगपतींनी सहभाग घेतला आणि सिक्कीमसह ईशान्येकडील राज्यांमध्ये गुंतवणुकीच्या घोषणा केल्या.

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the public that M/s. Qamar Developers, having its principal place of business at Mumbai, (hereinafter referred to as "my client") has entered into negotiations with Mr. Ismail Ibrahim Electricwala & others, all adult Indian (herein after referred to as the "other party") for the purchase of the Land with structure situated thereon (herein after referred to as the "said property"), owned by the "other party", being and lying at C.S. no. 1354 of Byculla Division and more particularly described in the "Schedule of property" written hereunder and the said negotiations have reached the final stage of culmination.

All PERSONS having any claim in respect thereof by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, lien or otherwise howsoever are requested to inform the same in writing to the undersigned having their office at 309-319, Ram Bhau Bhogle Marg, Qamar Enclave, 101, 1st Flr, Ghodapdev, Mumbai- 400010 and by way of email at adv.ammarak@gmail.com, within 14 (fourteen) days from the date hereof failing which any alleged claims or rights, if any, of such person or persons will be considered to have been waived, released, relinquished and/or abandoned.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO**

**Firstly:** All that piece or parcel of land or Sanadi land or ground situate on the Western Side of Huzuria Street and on the Eastern side of Underia Street, Mumbai, in the registration District and Sub-District of Mumbai City and Mumbai Suburban containing by admeasurement 366 square meters i.e. 438 square yards or thereabouts and registered in the books of the Collector of Land Revenue under Collector's New No.7749 and New Survey No.3883 Current Rent Roll No.7060 and Cadastral Survey No. 1354 of Byculla Division together with all buildings and structures standing thereon assessed by the Municipal Corporation of Greater Mumbai under E Ward No.259 and Street Nos. 30-38 Huzuria Street 2-6 Mastan Tank and 1-17 Underia Street.

**Secondly:** All that piece or parcel of quit and ground tenure land situate at Underia Street near Nagpada, Mumbai, in the Registration District and Sub-District of Mumbai City and Mumbai Suburban containing by admeasurement 172.46 square meters i.e. 201 square yards or thereabouts and registered in the books of Collector of Land Revenue under Old Nos. 495 and 496 and New Nos.7748, 7750, 7766 and New Survey No. 3882, 3884 and 3835 and Current Rent Roll No. 2876 and Cadastral Survey No. 1354 of Byculla Division together with all buildings and structures standing thereon assessed by the Municipal Corporation of Greater Mumbai E Ward No.637 and 638 and Street Nos. 7-9 Underia Street and 8-10 Huzuria Street Cross Lane, along with all the free sale FSI/ development potential arising therefrom.

Place: Mumbai
Dated this **30th** day of **May, 2025**

For **Ammar A K Legal Solutions**
Sd/-
**Ammar Kanorwala- Advocate**
Email: ammaraklegalsolutions@gmail.com
Mob: +91 9820597552

# राज्य सरकारच्या १२०० सेवा व्हॉट्सॲपवर उपलब्ध होणार! मुख्यमंत्र्यांची माहिती

परभणी



**महाराष्ट्र** सरकारच्या १२०० प्रकारच्या सेवा येणाऱ्या काळात व्हॉट्सॲपवर उपलब्ध होणार. तसेच अर्जासाठी लागणारे शुल्क देखील व्हॉट्सॲपच्या माध्यमातूनच घेतले जाणार आहे, अशी माहिती आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिली. आज परभणीत भाजपाद्वारे आयोजित केलेल्या विकासपर्व जाहीर सभेत ते बोलत होते. व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवांसाठीचे अर्जदेखील व्हॉट्सॲपवर भरावे लागतील. तसेच अर्जासाठी लागणारे शुल्कही व्हॉट्सॲपद्वारेच स्वीकारले जाईल. प्रमाणपत्रेही थेट व्हॉट्सॲपवर मिळतील, असे फडणवीस यांनी सांगितले. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अमेरिकन कपाशीच्या तीन सरळ वाणांचे लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर हिंगोली विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचे भूमिपूजन ही त्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना वर्षभर मोफत वीज देण्याचा आमचा संकल्प आहे. त्यासाठी २०२६ च्या डिसेंबरपर्यंत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीची कामे पूर्ण केली जातील. आता समृध्दी महामार्गाच्या माध्यमातूनही परभणी नकाशावर येईल. तसेच महानगर असणाऱ्या मुंबईशीही संपर्क वाढेल.

**JYOTI STRUCTURES LIMITED** Registered Office: Valecha Chambers, 6th Floor, New Link Road, Oshiwara, Andheri (West), Mumbai - 400 053. Tel : 4091 5000 Fax : 40915014/15, E-mail : investor@jsl.co.in , Website : www.jyotistructures.in

**EXTRACT OF STATEMENT OF STANDALONE AND CONSOLIDATED AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE YEAR ENDED MARCH 31, 2025** (Rs. In Crores)

| Sr. No. | Particulars | Standalone Results | | | | | Consolidated Results | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Year Ended | | Quarter Ended | | | Year Ended | |
| | | 31/03/2025 | 31/12/2024 | 31/03/2024 | 31/03/2024 | 31/03/2025 | 31/03/2025 | 31/12/2024 | 31/03/2024 | 31/03/2024 | 31/03/2025 |
| | | (Refer Note 2) | (Un-Audited) | (Refer Note 2) | (Audited) | (Audited) | (Refer Note 2) | (Un-Audited) | (Refer Note 2) | (Audited) | (Audited) |
| 1 | Total Income from Operations | 166.97 | 138.64 | 130.05 | 504.50 | 463.02 | 166.97 | 138.64 | 130.05 | 504.50 | 463.02 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 12.31 | 11.47 | 5.09 | 35.66 | 19.87 | 12.29 | 11.24 | 4.80 | 35.42 | 19.54 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (After Exceptional and/or Extraordinary items) | 12.31 | 11.47 | 5.09 | 35.66 | 19.87 | 12.29 | 11.24 | 4.80 | 35.42 | 19.54 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (After Exceptional and/or Extraordinary items) | 11.95 | 11.71 | 14.66 | 35.81 | 29.44 | 11.93 | 11.48 | 14.12 | 35.57 | 28.86 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after Tax) and other Comprehensive Income (after tax)] | 12.09 | 11.63 | 14.89 | 36.25 | 29.72 | 12.07 | 11.40 | 14.35 | 36.01 | 29.14 |
| 6 | Equity Share Capital (Face Value of Rs. 2/- each) | 237.69 | 180.23 | 146.19 | 237.69 | 146.19 | 237.69 | 180.23 | 146.19 | 237.69 | 146.19 |
| 7 | Other Equity as shown in the Audited Balance Sheet | - | - | - | 348.90 | (139.13) | - | - | - | 324.43 | (171.75) |
| 8 | Earnings Per Share (for continuing and discontinued operations | | | | | | | | | | |
| | 1. Basic earnings/ (loss) per share (in INR) | 0.136 | 0.169 | 0.209 | 0.406 | 0.421 | 0.135 | 0.165 | 0.202 | 0.403 | 0.412 |
| | 2. Diluted earnings/ (loss) per share (in INR) | 0.132 | 0.165 | 0.201 | 0.396 | 0.403 | 0.132 | 0.161 | 0.193 | 0.393 | 0.395 |

Note:

1 The above is an extract of the detail format of Standalone & Consolidated Audited Financials Results for the year ended March 31, 2025 filed with the National Stock Exchange and Bombay Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Standalone & Consolidated Audited Financials Results for the year ended March 31, 2025 are available on the websites of the National Stock Exchange (www.nseindia.com), Bombay Stock Exchange (www.bseindia.com) and the Company's website (www.jyotistructures.in)

2 The figures for the quarter ended March 31, 2025 and March 31, 2024 are the balancing figures between audited figures in respect of full financial year and the published year to date figures upto third quarter, which were subject to limited review by auditors.

Place : Mumbai
Date : May 28, 2025

By Order of the Board of Directors
**JYOTI STRUCTURES LIMITED**
**Sonali Gaikwad**
Company Secretary (ACS 31201)

# नवाकाळ

• मुंबई | शुक्रवार ३० मे, २०२५ • पान -८


## २ लाखांच्या कृषी कर्जाला सोने तारण बंद



तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांचा विरोध

**चेन्नई -** दोन लाख रुपयांपर्यंतच्या कृषी कर्जाला सोने तारण ठेवण्यास बँकांना मज्जाव करण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक नियमावलीला तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी कडाडून विरोध केला आहे. रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय अत्यंत चिंताजनक आहे, असे स्टॅलिन यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. रिझर्व्ह बँकेने यासंबंधी नुकत्याच जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांमुळे ग्रामीण भागातील आणि विशेषत: तामिळनाडूच्या ग्रामीण भागांतील कर्ज देवाण-घेवाणीच्या व्यवस्थेवर विपरित परिणाम होईल. छोटे शेतकरी, जमीन भाडेपट्ट्यावर घेऊन शेती करणारे शेतकरी आणि शेतीपूरक अशा कुक्कुटपालन, दुग्ध उत्पादन आणि मस्त्यशेती अशा छोट्या व्यावसायिकांना गरज लागेल तेव्हा कर्ज उपलब्ध होणेच बंद होऊन जाईल, अशी भूमिका मांडत स्टॅलिन यांनी रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक नियमावलीला विरोध केला आहे.

## पितृसत्ताक जपान आणि शिस्तीत होणारी मज्जा

(भाग ४: पूनम माजगावकर)



बॉन्साय

**जपानच्या** टोकियो शहरातील एका मोठ्या गार्डनमध्ये फिरून झाल्यावर तिथल्या कॅफेमध्ये मी साकुरा चवीचे सुंदर गुलाबी रंगाचे आईस्क्रीम खाल्ले. साकुरा म्हणजे चेरी ब्लॉसम! त्या आईस्क्रीमला चक्क त्या फुलांचा वास व स्वाद होता. इतक्या 'नाजूक' चवीचे आईस्क्रीम मी पहिल्यांदाच खाल्ले. ह्या ट्रिपमध्ये साकुरा ऋतू डोळ्यांनी अनुभवला नसला तरी तो पोटात मात्र साठवून ठेवला!

तिथल्या बऱ्याच गार्डन्समध्ये अजून एक वेगळे दृश्य पाहायला मिळाले. तेथील झाडांना आकार द्यायचे काम चालले होते. त्या त्या प्रभागाच्या गार्डनची देखभाल करणाऱ्या क्षेत्राची माणसं झाडावर चढून त्याची पानं, फांद्या अतिशय हळुवारपणे खुडत/कापत होती. शिवाय काही ठिकाणी झाडांभोवती एक वेगळ्या प्रकारचे पिरॅमिड सारखे, बांबूचे बंदिस्त कुंपण घालून त्या झाडाला मर्यादेच्या बाहेर वाढू न द्यायचे बंधन असावे. ती झाडे जरी छान दिसत होती तरी ऐकलेल्या, वाचलेल्या पूर्वीच्या काही प्रथांची आठवण झाली. स्त्रीची पावले छोट्या आकाराची असणं हे सौंदर्याचं लक्षण मानलं जायचं. ती पावले अशी छोटी व आखीव रेखीव राहावी म्हणून लहानपणापासून मुलींना अतिशय घट्ट, क्वचित वेदना देणारे, पावलं बंदिस्त ठेवणारे लाकडी बूट घालण्याची पद्धत होती. जेणेकरून पावलांचा आकार मोठा होणार नाही. चुकीच्या समजुतींपायी स्त्री वर्गाला हा एक प्रकारचा अन्याय सहन करावा लागे.

निसर्गावर इतके प्रेम करणाऱ्या ह्याच जपानी लोकांचा हा अतिशय टोकाचा स्वार्थी विचार मनाला पटला नाही. बॉन्सायचा जन्म असाच झाला असावा का?

एका श्राईनमध्ये खूप सुंदर बॉन्साय च्या अविष्कारांचे प्रदर्शन पाहिले. आवडले नक्की. पण हा निसर्गाच्या विरुद्ध जाऊन कुठलीतरी उंच उंच जाऊ पाहणारी इच्छा एक प्रकारे कह्यात ठेवण्याचीच ही कल्पना वाटली.

जपानी कुटुंब व्यवस्थेत अजूनही पितृसत्ताक पद्धती आहे. पुरुष क्वचितच बायकांना घरकामात वगैरे मदत करतात. म्हणजे बायकांनी करियर करायचे, घराबाहेर पडून काम करून पैसे मिळवायचे आणि घरीही घरकाम, स्वयंपाक, मुलांना वाढवणे वगैरे करायचे. ह्याच कारणासाठी मुले होऊ न देण्याकडे कल जास्त असावा. घटस्फोटाचे वा लग्नही न करण्याचे प्रमाणही जास्त असावे.

मला मात्र रस्त्यांवर, गार्डन्समध्ये, रेस्टॉरंटमध्ये सगळीकडे लहान बाळे व मुले दिसली. हल्ली आपल्याकडेही जाणवणाऱ्या मुले होऊ न देण्याच्या तरुण पिढीच्या या ऑप्शन चा तिथेही अंगीकार झालाच असेल. पण तो अतिरेकी वाटला नाही. सार्वजनिक ठिकाणी बरीच कपल्स तसेच स्त्रिया लहान मुलांना हाताला धरून वा बाबागाडीत घालून, सायकलवर मागे बसवून फिरताना दिसली.

जपानला जाण्याआधी काही जणांकडून, तसेच इंटरनेटवरून तिथल्या जीवनपद्धती, तरुण लोकांचे टोकाला जाणारे विचार, त्यामुळे आलेले हताशपण, डिप्रेशन, आत्महत्येच्या वाढलेल्या प्रवृत्ती, मित्र-मैत्रिणी नसल्याने आलेला एकटेपणा याविषयी खूप ऐकले, वाचले होते. तसे काही प्रमाणात आहेही. पण एकंदरीत तिथे फिरताना मला लोक आनंदी वाटले. मित्र मित्र, मैत्रिणींचे ग्रुप, छोट्या मुलांना घेऊन फिरणारी तरुण कपल्स, प्रियकर प्रेयसी, आई मुलगी आणि आवर्जून उल्लेख करावा असे रेस्टॉरंट मध्ये स्वतःच्या लहान मुलांना घेऊन येणारे ' बाबा' लोक अनेक वेळा दिसले.

जपानी लोक खूप एन्जॉय करताना दिसले. मात्र त्यांची एन्जॉयमेंटची व्याख्या वेगळी आहे. कमालीची शिस्त, सार्वजनिक ठिकाणी शांतता, सभ्य रितीभाती, आपला त्रास दुसऱ्याला होऊ नये ह्यासाठी घेतलेले श्रम ह्यामुळे व आपल्यासारखा आवाजी आनंद व्यक्त करण्याची सवय नसल्याने जपानी लोकांबद्दल गैरसमज हा जास्त प्रमाणात असावा.

शिवाय ९९% लोक फक्त काळा, पांढरा, ऑफव्हाईट, ब्राऊन, करडा आणि मळकट हिरवा (शेवाळी) ह्याच रंगांचे कपडे परिधान करतात. त्याशिवायचे कोणतेही रंग, छटा सहसा डोळ्याला दिसत नाहीत. या छटा मला तर फारच भावल्या. जपानी लोकांमध्ये ओतप्रोत भरलेल्या सौंदर्य आणि कलेचे प्रतीक!!

ह्या उगाचच 'उदास' समजल्या जाणाऱ्या रंगसंगतीमुळे सुद्धा जपानेतर लोकांना हे सर्व डिप्रेसिंग वाटण्याची शक्यता असेल. नाही का?




सर्वात बिझी झेब्रा क्रॉसिंग

निप्पोरी फॅब्रिक स्ट्रीट म्हणजे पुण्याचा अद्ययावत लक्ष्मी रोडचं जणू. तिथेही जुन्या व नवीन प्रकारच्या कापडांची बरीच दुकाने होती. तसेच विविध प्रकारची बटणे, लेस वगैरे फॅशनसाठी गरजेच्या अनेक वस्तूंची पण मोठी मोठी दुकाने होती. सांगायचे म्हणजे बरीचशी दुकाने साधारण सीनियर सिटीझन असणाऱ्या स्त्रिया चालवत होत्या. वागायला, बोलायला अतिशय गोड आणि दुकानातील वस्तू दाखवायला तत्पर असलेला ह्या स्त्रिया माझ्या मनात फारच भाव खाऊन गेल्या. परिणाम असा की माझी पर्स हलकी झालेली जाणवली तिथून घरी परतताना!!

तिथे जगातील सगळ्यात बिझी मानले जाणारे झेब्रा क्रॉसिंग आहे. हिरवा दिवा लागताच वारूळ फुटल्यासारखे माणसांचे जत्थे तिथून चक्क एकमेकाचा धक्काही न लागता लगबगीने रस्ता क्रॉस करतात. एकदम बघण्यासारखे दृश्य. मी पण काहीच कारण नसताना उगीचच अनेक वेळा तेथून रस्ता क्रॉस करून पाहिला.

## चार भिंतीआड संवाद साधा! मिटकरींचा सल्ला

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे संवादात चांगले नसल्याचे वक्तव्य केले होते. त्यावरून अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी एक्स पोस्ट करून मुख्यमंत्र्यांना उपदेश केला. त्यांनी म्हटले की, आपण राज्याचे उत्तम कर्णधार आहात. उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे आपल्या टीममधील प्रमुख खेळाडू आहेत. जनतेसह सरकारसोबतसुद्धा त्यांचा उत्तम संवाद आहेच. कर्णधारांनी असे जाहीर बोलून संभ्रम निर्माण करण्याऐवजी चार भिंतींच्या आत उत्तम संवाद साधणे, हे राज्याला अपेक्षित आहे.

## सहा कोटींचे इनाम असलेल्या कुख्यात नक्षलवादी हिडमाला ओडिशामध्ये अटक

■ कोरापूट

**कुख्यात** नक्षलवादी कुंजूम हिडमा याला ओडिशा पोलिसांनी कोरापूट जिल्ह्यातून अटक केली. त्याच्यावर पोलिसांनी सहा कोटींचे इनाम जाहीर केले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सुचनेनुसार केंद्र सरकारकडून देशभरातील विविध राज्यांमध्ये नक्षलवाद विरोधात कठोर कारवाई केली जात आहे. नक्षलवाद समूळ उच्चाटन करण्याचे सरकारचे प्रयत्न सुरु आहेत.त्यासाठी नक्षलग्रस्त भागांत विशेष मोहीमा राबवलया जात आहेत. अशाच मोहिमेदरम्यान कुंजम हिडमा पोलिसांच्या हाती लागला. हिडमा महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया येथील नक्षलग्रस्त भागात नक्षली कारवायांमध्ये सक्रिय होता. त्याच्याकडून एके ४७ रायफल आणि ३५ काडतुसे,११७ डेटोनेटर, गनपावडर,



रेडिओ, चाकू आणि अन्य आक्षेपार्ह सामुग्री पोलिसांनी जप्त केली. हिडमाच्या अटकेमुळे ओडिशा,छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशच्या सीमाभागांत सक्रिय असलेल्या नक्षलवाद्यांना धक्का बसला आहे.

## सत्तेची तहान लागली म्हणून गटाराचे पाणी पिऊ नका

■ मुंबई

संजय राऊतांचा सुप्रियाला टोला

**राष्ट्रवादी** काँग्रेस पार्टी अजित पवार गट आणि शरद पवार गट यांचे विलिनीकरण आणि भाजपासोबत जाण्याच्या चर्चेवर आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी जळजळीत प्रतिक्रिया दिली. काहींना भाजपासोबत जाण्याची तहान नक्कीच लागली असेल. पण तहान लागली म्हणून कोणी गटाराचे पाणी पित नाही, असा सूचक टोला त्यांनी सुप्रिया सुळे यांना लगावला.

राऊत म्हणाले की, भाजपावाले सुप्रिया सुळे आणि अन्य काहींची वारंवार नावे घेतात. त्यांना भाजपामध्ये जाण्याची तहान नक्कीच लागली असेल. पण तहान लागली म्हणून कोणी गटाराचे पाणी पित नाही. तहान लागली तरी कुठल्या डबक्यात उडी मारायची की महासागरात उडी मारायची याचा विचार करावा लागेल. कारण महासागरात आधीच प्रचंड लाटा उसळत आहेत. खूप गर्दी झाली आहे. जे आधी तिथे गेले आहेत तेच स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी धडपडत आहेत. महासागरात प्रत्येकाला आपले स्थान स्वतः शोधावे लागते.

छगन भुजबळ यांच्या मंत्रिपदाबाबत बोलताना राऊत यांनी भाजपावर दिल्लीतून महाराष्ट्राची सुत्रे हलवण्याचा आरोप केला. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात घेण्याचा निर्णय भाजपाच्या दिल्लीतील नेत्यांनी घेतला. तो निर्णय घेताना भुजबळ ज्या पक्षात आहेत, त्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख असलेल्या अजित पवारांना विचारले नाही. दिल्लीतून आदेश आला आणि भुजबळांना मंत्रिपद मिळाले.भाजपा सातत्याने अजित पवार यांचा अपमान करत आहेत. त्यामुळे अजित पवार यांना शांत झोपही लागत नसेल. उद्या शिंदे गटातील कोणालातरी असे दिल्लीतून मंत्री केले जाईल. शिंदेंचे अनेक साथीदार त्यासाठी उत्सुक आहेत, असा खोचक टोला राऊत यांनी लगावला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच एका मुलाखतीत शरद पवार यांचे तोंडभरून कौतुक केले. त्यावर फडणवीस यांनी शरद पवारांचे एवढे कौतुक केले त्याअर्थी त्यांनी नक्कीच दिल्लीची परवानगी घेतली असेल. कारण दिल्लीसमोर फडणवीसांचे काहीही चालत नाही. आम्हाला शरद पवार यांचे कौतुक करताना कोणाची परवानगी घ्यावी लागत नाही, अशी मिश्किल टिप्पणी राऊत यांनी केली.

## राज्यात सीबीएससी पॅटर्नला मराठा महासंघाचा विरोध

■ पुणे

**राज्यात** सीबीएससी पॅटर्न लागू करण्यास अखिल भारतीय मराठा महासंघाने विरोध केला आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएससीच्या) शाळांमध्ये इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या अभ्यासक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर फक्त एक धडा आहे. हा पॅटर्न महाराष्ट्रात लागू करताना विचार करा. त्यात बदल करा. अन्यथा शिक्षणमंत्र्यांच्या घरासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अखिल भारतीय मराठा महासंघाचे अनिल ताडगे आणि मराठा क्रांती मोर्चाचे सचिन आडेकर यांनी दिला.

मराठा महासंघाचे अनिल ताडगे म्हणाले की, सीबीएससी बोर्ड हे देशपातळीवर शिकवल्या जाणाऱ्या इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवर फक्त ६८ शब्द छापले असतील तर हे निषेधार्ह आहे. या शाळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी उभ्या केलेल्या स्वराज्याचा एवढ्या कमी शब्दांमध्ये इतिहास सांगून सीबीएससी बोर्डाने छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरच महाराष्ट्राचा अपमान केला आहे. याबाबत राज्याच्या शिक्षण मंत्र्यांची भेट घेऊन निवेदन देणार आहोत. यामध्ये बदल केला नाही तर शिक्षण मंत्र्यांच्या घरासमोर तीव्र आंदोलन करू.




मराठा क्रांती मोर्चाचे सचिन आडेकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराराणी व थोरले शाहू महाराज या सर्वांचाच इतिहास अत्यंत कमी शब्दांमध्ये देऊन दिल्लीचे सीबीएससी बोर्ड मराठ्यांचा अपमान करत आहे. बाजीराव पेशवे हे छत्रपतींचे सेवक होते मराठ्यांचे राजे नव्हते. त्यामुळे सीबीएससी बोर्डाने केलेल्या चुका तातडीने दुरुस्त कराव्यात.

याची दखल राज्य सरकारने घेऊन सीबीएससी पॅटर्न राज्यात लागू करताना विचार करावा. त्यांनी या सर्व गोष्टींची दखल घेतली नाही, तर सीबीएससी पॅटर्नच्या या पुस्तकांची आम्ही होळी करू.

## कुंभमेळ्यातील शाही स्नानाच्या तारखा १ जूनला जाहीर होणार

■ नाशिक

**त्र्यंबकेश्वर** येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला आहे. येत्या १ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शाही स्नान व पर्व स्नानाच्या तारखांची अधिकृत घोषणा होणार आहे.

महाकुंभ ३१ ऑक्टोबर २०२७ रोजी ध्वजारोहणाने सुरू होणार आहे. हा भव्य धार्मिक सोहळा तब्बल १८ महिन्यांच्या कालावधीत नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पार पडणार आहे. यामध्ये ३ प्रमुख शाही स्नान आणि एकूण ४२ पर्व स्नान होणार आहेत. कुंभमेळ्याच्या नियोजनासंबंधी एक महत्त्वाची बैठक नाशिकमध्ये आयोजित करण्यात आली आहे. यासाठी १३ प्रमुख आखाड्यांचे साधू-महंतांना यामध्ये निमंत्रित करण्यात आले आहे. साधू समुदायाकडून होत असलेल्या कायमस्वरूपी सुविधा निर्माण करण्यासाठी जागा खरेदी करण्याच्या मागणीवर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## काश्मिरात लष्कर-ए-तोयबाच्या दोन दहशतवाद्यांचे आत्मसमर्पण

■ शोपियान

**पहलगाम** दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सुरक्षा दलांनी जम्मू-काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यात दहशतवादाविरुद्धची मोहीम तीव्र केली आहे. शोपियान जिल्ह्यात लष्कर-ए-तोयबाच्या दोन दहशतवाद्यांनी आज आत्मसमर्पण केले. त्यांच्याकडून मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

शोपियानच्या बास्कुचन भागात संशयास्पद हालचाली निदर्शनास आल्यानंतर कालपासून पोलीस आणि सुरक्षा दलांकडून शोधमोहीम राबवण्यात आली. या शोधमोहिमेदरम्यान लष्कर-ए-तोयबाच्या इरफान बशीर आणि उजैर सलाम या दोन दहशतवाद्यांनी आत्मसमर्पण केले.

हे दोघे हायब्रिड दहशतवादी म्हणून काम करायचे. सामान्य लोकांसारखे जगणारे पण गुप्तपणे दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होणाऱ्यांना हायब्रिड दहशतवादी म्हटले जाते. या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून दोन एके-५६ रायफल, ४ मॅगझिन, १०२ जिवंत काडतुसे, २ हातबॉम्ब इत्यादी साहित्य जप्त केले.

## समृद्धी महामार्गात म्हाडाचे एक हजार कोटी रुपये अडकले

■ मुंबई

**एमएसआरडीसीच्या** माध्यमातून बांधण्यात आलेल्या समृद्धी महामार्गाच्या बांधकामाला म्हाडाने एक हजार कोटी रुपये दिले होते त्याला आठ वर्षे होत आहे. म्हाडा या रकमेच्या परताव्याच्या प्रतीक्षेत आहे.




याबाबत माहिती देताना एका अधिकाऱ्याने सांगितले की, शासनाच्या निर्देशानुसार २०१७ ला एमएसआरडीसीला समृद्धी महामार्गाच्या बांधकामासाठी म्हाडाने आठ टक्के व्याजाने एक हजार कोटी रुपये दिले होते. ही रक्कम व्याजासह काही वर्षांत परतावा स्वरूपात म्हाडाला दिली जाणार होती. २०२२ मध्ये या मार्गाच्या दोन टप्प्यातील काम पूर्ण झाले आहे. या रकमेवरील व्याज घेऊ नका, असे शासनाने म्हाडाला कळविले. त्यानुसार व्याज न घेण्याचे ठरले आहे. पण मुद्दल रक्कम एक हजार कोटी रुपयांऐवजी समृद्धी महामार्गालगतची मोकळी जमीन घ्या, असे एमएसआरडीसीकडून म्हाडाला दोन वर्षांपूर्वी कळविण्यात आले होते. पण 'बोलाचा भात आणि बोलाची कडी' आम्हाला जमीन देण्याच्या हालचाली दिसत नाही. त्यामुळे म्हाडा द्विधा मनस्थितीत आहे.

## मेडिकल पीजीसाठी बाँडची अट स्थगित

■ मुंबई


**एमबीबीएस** पदवीधारकांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाला (पीजी) प्रवेश घेताना लागू असलेली एक वर्ष सक्तीच्या बंधपत्राची अट राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने तूर्त स्थगित केली आहे.

२०१७ साली राज्य सरकारने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार एमबीबीएस पदवीधारकांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याआधी एक वर्ष सरकारी रुग्णालयात सेवा देणे बंधनकारक करण्यात आले होते. या शासननिर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली. मात्र असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) या डॉक्टरांच्या संघटनेने वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन महासंचलनालयाला पत्र लिहून या शासन निर्णयावर सवाल उपस्थित केला होता. संघटनेने राज्याचे मुख्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांशी पत्रव्यवहार केला. त्यानंतर आता वैद्यकीय शिक्षण विभागाने या निर्णयाला स्थगिती दिली.

## 'सेबी'च्या माजी अध्यक्षा माधवी पुरी बुचना क्लीनचिट

■ मुंबई-

'सेबी' या भारतातील एका महत्त्वाच्या संस्थेच्या माजी अध्यक्षा माधवी पुरी बुच यांना हिंडनबर्गने केलेल्या आरोपप्रकरणी क्लीनचिट दिली आहे. त्यांची भ्रष्टाचाराच्या आरोपांमधून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. अमेरिकेतील शॉर्ट सेलर कंपनी हिंडनबर्गने, माधबी बुच आणि अदानी समूहाबाबत गंभीर आरोप करत खळबळ माजवली होती. मात्र, लोकपालने या सर्व आरोपांना निराधार ठरवले आहे.



'हिंडनबर्ग' केलेले आरोप निराधार!

हिंडनबर्ग रिसर्चने १० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात असा दावा केला होता की, अदानी समूहाच्या परदेशी गुंतवणुकीत माधवी पुरी बुच व त्यांचा पती धवल बुच यांची कथित हिस्सेदारी होती. सेबी व अदानी समूह यांच्यात 'मिलीभगत' असल्याचेही या अहवालात म्हटले होते. या आरोपांमुळे आर्थिक व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली होती. मात्र लोकपालने सादर केलेल्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे की, या प्रकरणात दाखल करण्यात आलेली तक्रार कोणत्याही प्रकारे साक्षांवर आधारित नाही. कोणतेही ठोस पुरावे किंवा कायदेशीर आधार न सापडल्यामुळे ही तक्रार 'योग्यता नसलेली' असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे कोणताही गुन्हा किंवा तपास सुरू करण्याचा विषयच नाही. लोकपालच्या या अहवालानंतर माधवी पुरी बुच यांच्यावर लावण्यात आलेले सर्व आरोप अधिकृतरित्या फेटाळण्यात आले आहेत आणि त्यांना क्लीनचिट देण्यात आली आहे.